संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा







## परिवर्तन घडणार, नगर बदलणार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) । काँग्रेस । शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मित्रपक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार

| अ. क्रमांक | उमेदवाराचे नाव | फोटो | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | अभिषेक बाळासाहेब कळमकर<br>Abhishek Balasaheb Kalamkar | | |

आपली निशाणी
तुतारी वाजविणारा माणूस

तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा.

प्रकाशक : निलेश मालपाणी, अ.नगर शहर विधानसभा अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)





रजि नं. ११४३९-५७/७७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. १२.११.२०२४ | अंक नं. २१२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020






विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™

संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

सावेडी, नगर-मनमाड रोडटच बिल्डींग
भाड्याने देणे आहे
१०००० स्क्वे.फूट
हॉस्पीटल, हॉटेल, मॉलसाठी
उपयुक्त अशी बिल्डींग
प्रशस्त पार्किंग सुविधांसह
: संपर्क : Mo. 9404717371



शुध्द आरोग्यदायी ड्रायफ्रुटस्

| | | | | |
|---|---|---|---|---|
| काजु | खिसमिस | खोबरं | केर सांगरी | मेलन सीडस् |
| बदाम | काळा मनुका | गाईचे तुप | कागदी बदाम | खारीक खोबरं मिक्स |
| अंजीर | जरदाळू | धावडा डिंक | सनफ्लॉवर सीडस् | खारा काजू |
| अक्रोड | मखाना | मामरा बदाम | चिया सीडस् | मसाला काजू |
| खारा पिस्ता | खारीक | खजुर | पमकीन सीडस् | खारा बदाम |

ड्राईड पायनापल, मँगो, किवी, स्ट्रॉबेरी, पॉमेलो, क्रॅनबेरी, मिक्स फ्रुट
उत्कृष्ट दर्जा माफक दर...
भूमी एजन्सीज
सुकामेवा आणि मसाल्याचे ठोक व किरकोळ विक्रेते
मिक्स खडा मसाला उपलब्ध
आनंद कॉम्प्लेक्स, दाळ मंडई, अ.नगर. M. 9011163452


# नगर शहर विधानसभा मतदारसंघातील जगताप-कळमकर 'लढत' ठरणार 'रंजक'

## निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात, खा. निलेश लंकेमुळे आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये वाढला 'आत्मविश्वास'

नगर - विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून अहमदनगर शहर



मतदार संघातील निवडणूक रंजक वळणावर पोहचली आहे. या निवडणुकीत मनसेसह काही अपक्ष उमेदवार आपले नशीब अजमावत असले तरी महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप आणि महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांच्यातच खरी लढत होत आहे. या दोन युवा उमेदवारांपैकी कोण बाजी मारतो हे २३ जानेवारीलाच स्पष्ट होणार आहे. दरम्यान आतापर्यंतच्या तब्बल ७ विधानसभा निवडणुकीत मतदान यंत्रावर नेहमी झळकणारे अनिल राठोड हे नाव यावेळी मात्र मतदारांना दिसणार नाही.

### सात निवडणुकीनंतर प्रथमच मतदान यंत्रावर अनिल राठोड यांचे नाव नसणार

नगर शहरात विधानसभेची निवडणूक म्हटली की स्व. अनिल राठोड आणि विरोधी जो कोणी उमेदवार असेल तो असे समीकरण पहायला मिळायचे. सलग ५ निवडणुका जिंकल्यानंतर पुढील दोन निवडणुकांमध्ये त्यांचा निसटता पराभव झाला. मागील ३५ वर्षापासून त्यांचे नाव नेहमीच मतदान यंत्रावर झळकले. ते आता हयात नाहीत. यंदा मात्र त्यांचे नाव दिसणार नाही अशी हुरहुर मतदार व्यक्त करत आहेत.

### निवडणूक प्रचार शिगेला, मतदार मात्र बोलता होईना

निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. जो-तो कार्यकर्ता, पदाधिकारी जीव ओतून प्रचार करत आहे. मतदारांच्या घरा-दारापर्यंत जाऊन आपल्या उमेदवाराचा प्रचार केला जात आहे. असे असताना शहरातील मतदार मात्र अद्यापही व्यक्त होताना दिसत नाही. मतदानाच्या दिवशी मतदान करायचे एवढे बोलून उमेदवार असो अथवा प्रचार याबाबत कोणीही काही बोलण्यास तयार नाही. यामागचे नेमके कारण काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे.

### कमी वेळेत कळमकरांनी जुळवून आणली प्रचारयंत्रणा

या मतदारसंघात महायुती आणि महाविकास आमने सामने असून विद्यमान आमदार संग्राम जगताप आणि माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यात सरळ सरळ लढत होत आहे. जगताप यांनी महायुतीची उमेदवारी निश्चित समजून अनेक महिन्यांपासून निवडणुकीची तयारी केलेली आहे. त्यामुळे त्यांची प्रचारयंत्रणा शहरात अनेक महिन्यांपासून राबत आहे. त्या तुलनेत कळमकर यांच्या प्रचाराची सुरुवात उशीरा झाली. महाविकास आघाडीत नगरची जागा कोणाकडे यावरच अनेक दिवस 'खल' होत राहिला. त्यातही ही जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडे आल्यास उमेदवारी कोणाला? हा प्रश्न अनेक दिवस चर्चेत राहिला. अखेर आघाडीच्या जागावाटपात नगरची जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाला मिळाली आणि उमेदवारीची माळ कळमकर यांच्या गळ्यात पडली. त्यानंतर म्हणजेच प्रत्यक्ष निवडणूक सुरू झाल्यानंतर कळमकर यांनी आघाडीची प्रचारयंत्रणा जुळवून प्रचारात जगताप यांच्या बरोबरीने 'चाल' केली आहे.

### लोकसभेतील विजय आघाडीसाठी 'टॉनिक'

या निवडणुकीत जगताप यांना स्वपक्षासह भाजप आणि शिवसेने(शिंदे)ची साथ मिळाली असून, प्रचारात माजी खा. सुजय विखे यांनीही पाठबळ दिले आहे तर कळमकर यांच्या पाठीशी काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) ठामपणे उभी असून, खा. निलेश लंके त्यांच्यासाठी सुरुवातीपासूनच मैदानात उतरले आहे. प्रतिस्पर्धी उमेदवार कोणी असो जनतेचा आशीर्वाद मिळाल्यास विजय मिळविणे अवघड नसते हे खा. लंके यांनी लोकसभा निवडणुकीतून दाखवून दिले आहे. विखे कुटुंबातील उमेदवाराचा पराभव आपण करू शकतो हे लंके यांच्या माध्यमातून सिद्ध झाल्याने आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. त्याच बळावर कळमकर यांची प्रचार यंत्रणा राबताना दिसत आहे. तथापि जगताप यांची तगडी प्रचार यंत्रणा, त्यांना प्रचारासाठी मिळालेला अधिकचा अवधी आणि असलेली साधन सामग्री याचा विचार केल्यास आज तरी नगर शहरातील ही लढत अधिक रंजक होईल असेच दिसत आहे.



शहरातील माळीवाडा परिसरात असलेल्या शिशु संगोपन, महात्मा फुले तसेच फिरोदिया शाळेच्या परिसरात ड्रेनेज लाईनचा खड्डा उघडा असून, शाळकरी मुलांसह नागरिकांची या भागात मोठी वर्दळ असते. या खड्ड्यात पडून एखाद्याच्या जिविताला धोका होऊ शकतो. महापालिका प्रशासनाने याबाबत तातडीने दखल घेवून ड्रेनेजलाईनचे झाकण बसवावे, अशी मागणी होत आहे.


WANTED
An opportunity to work with Nirmal Group. Give your career a new height..

GRAPHICS DESIGNER 1 Post (M/F)
Command On Coreldraw, Photoshop, Adobe Illustrator Softwares. Marathi & English Typing Must. Minimum 3 yrs. Experience.

MARKETING EXECUTIVE 2 Post (M/F)
MBA, Graduate, Good Communication Skill, Knowledge of Marathi, Hindi & English Language, Smart Personality, Self Vehicle, Minimum 2 yrs. Experience in field.

ASSISTANT ARTIST 1 Post (M/F)
Knowledgw of Coreldraw, Photoshop, Adobe Illustrator Softwares. Minimum 1 yrs. Experience

ACCOUNTANT 1 Post (M/F)
B.Com or Any Graduate, Knowledge of Tally prime Software. Minium 2 yrs. experience

RECEPTIONIST 1 Post (F)
Any Graduate, Knowledge of Marathi, Hindi & English Language.

OFFICE BOY 2 Post (M)
10th / 12th Pass / Fail

Fresh candidates can also apply. Walk In Interview with detailed Resume, Within 4 Days Between 4 pm To 6.30 pm

NIRMAL ...THE LANGUAGE OF IDEAS
ADVERTISING I CREATIONS I DISPLAY SOLUTIONS
Prabodhan, Urban Bank Colony, Burudgaon Road, Ahmednagar 414001 (MS)
nirmalcrtn@gmail.com
98900 18888 / 94033 18888


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. दिगंबर मारूती साळुंके** यांचे पुर्वज नामे **कै. भवानी साळुंके उर्फ घिसाडी, कै. भैरू (बहिरू) भवानी साळुंके उर्फ घिसाडी व कै. मारूती भैरू साळुंके उर्फ घिसाडी** यांच्या मालकीच्या मिळकती अहिल्यानगर (अहमदनगर) येथील कॅन्टॉन्मेंट क्षेत्र, नगर औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, घोडेगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्हयातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील फोटोंमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री. वसंत सहादू साळुंके, २) श्री. सुरेश सहादू साळुंके, ३) श्री. चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री. नितीन किसन साळुंके परस्पर खोटयानाटया कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिऱ्हाईत इसमांची दिशाभूल करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. **त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलीसांत फिर्याद अर्ज दिला होता. सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतींबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळत: बेकायदेशीर राहिल.** त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, घान, लिज, लिन, ट्रान्सफर, खरेदी विक्री, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमती शिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकादेशीर व रद्द समजण्यात येईल.

सबब सदरील जाहीर नोटीस दिली असे.

अहिल्यानगर
दि: १२/११/२०२४

**ॲड. मयुर दिगंबर साळुंके**
फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग,
सिटीएस २८९, शुक्रवारपेठ, पुणे ४११००२.
मोबाईल ९१५८८७४७३९



श्री. सुरेश सहादू साळुंके



श्री. नितीन किसन साळुंके



श्री. चंद्रशेखर किसन साळुंके



श्री. वसंत सहादू साळुंके

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रगती चालू... तरीही काही प्रश्न, समस्या

आपली अर्थव्यवस्था, सोने, शेअरबाजार वेगाने वाढत आहे. जगातल्या पहिल्या ५ टॉपच्या अर्थव्यवस्थेत आपण आलोय. एकीकडे श्रीमंतांची यादी वाढत असली तरी गरीबांची यादी त्यापेक्षा कितीतरी मोठी व गंभीर आहे.

यंदाच्या ग्लोबल हंगर इंडेक्सने भारताच्या कुपोषणाच्या स्थितीवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. देशातील कुपोषणाचे प्रमाण आणि अन्नसुरक्षेच्या समस्यांना अधोरेखित करताना या अहवालात काही धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. कुपोषितांची संख्या तब्बल १४% आहे.

निसर्गाचा लहरीपणा, वाढते शहरीकरण, घटती जलसंपत्ती, कृषी क्षेत्रात घट इ. प्रश्न, समस्यांमुळे शेती व शेतीपूरक सेवा यावर मोठे परिणम होत आहेत. ग्रामीण व आदिवासी वाड्या वस्तीतील लोकांना अन्न मिळवण्यास मोठा संघर्ष करावा लागतोय.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : “मुसाफिर”–९८२२०२०६९१



भारताच्या आरोग्यसेवा प्रणालीत अनेक गंभीर समस्या आहेत. बालमृत्यू, कुपोषण, खुजेपणइ इ. समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रभावी व व्यापक आरोग्य यंत्रणा, उपचार प्रणाली आवश्यक आहे.

कुपोषणावर मात करण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणाली आहे. तरीपण अनियमितता, भ्रष्टाचारामुळे अत्यंत गरजू गरीबांपर्यंत अन्नधान्य पोहोचत नाही.

देव ना करो दुष्काळ, पाणीटंचाई हे प्रश्न वाढले तर गरीब व कुपोषित लोकसंख्येवर प्रचंड परिणाम होईल. याची जाण व भान सगळ्यांनाच ठेवावे लागेल. म्हणूनच प्रगतीचा समृद्धीचा मार्ग खेड्यापाड्यापर्यंत गेला तरच तो विकास सर्वसामान्यांपर्यंतचा ठरेल.

# डॉक्टरसह कर्मचारी व वाहनचालकाला मारहाण करत लुटले

नगर – हॉटेल मध्ये जेवणासाठी थांबलेल्या डॉक्टरसह त्याच्या कर्मचाऱ्याला व वाहन चालकाला गाडी पार्किंग च्या वादातून शिवीगाळ मारहाण करत चालकाच्या खिशातील १५ हजारांची रोकड बळजबरीने काढून घेतल्याची घटना नगर पुणे महामार्गावर चास (ता.नगर) शिवारात असलेल्या हॉटेल चूल मटन या ठिकाणी रविवारी (दि.१०) रात्री ९ च्या सुमारास घडली.

याबाबत योगेश विजयकुमार झावरे (वय ३०, रा. भेंडा कारखाना, ता.नेवासा) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी योगेश झावरे हे डॉक्टर असून त्यांचा भेंडा येथे दवाखाना आहे. ते दवाखान्यासाठी बेड व एक्स रे मशीन आणण्यासाठी भाड्याने सुनिल अढागळे यांची मालवाहू गाडी घेवून कर्मचारी अनिल सापते यास बरोबर घेवून रविवारी पुणे येथे गेले होते. तेथून परतत असताना रात्री ९ च्या सुमारास ते तिघे जेवण्यासाठी चास जवळील चूल मटन या हॉटेल जवळ थांबले. त्यांची गाडी चालकाने पार्क केल्यावर तेथे शेजारीच असलेल्या हॉटेल जत्रा येथून एक जण आला व त्याने चालकाला गाडी पार्क करण्यावरून शिवीगाळ सुरु केली. त्यांनी त्यास आम्ही १० मिनिटात जेवण करून जाणार असल्याचे सांगितले. मात्र तो तुमच्या कडे पाहतोच असे म्हणून फोन वर बोलत निघून गेला.

त्यानंतर फिर्यादी झावरे व त्यांचा कर्मचारी सापते हे दोघे हॉटेल मध्ये गेले असता तो व्यक्ती इतर दोघांना घेवून पुन्हा आला व त्याने लगेच शिवीगाळ करत दोघांना मारहाण सुरु केली. हॉटेल मधील इतर व्यक्ती हे भांडण सोडवत असताना फिर्यादी यांचा गाडी चालक बाहेरून पळत आला व त्याने हॉटेल जत्रा मधून आलेल्या ४ जणांनी मला मारहाण करत खिशातून १५ हजार रुपये बळजबरीने काढून घेतल्याचे सांगितले. त्यावेळी फिर्यादीला मारहाण करणाऱ्या व्यक्तीने चालकालाही लाथ मारली. तसेच तिघांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हॉटेल मधील इतर लोकांनी पुन्हा भांडण सोडवल्यावर मारहाण करणारे तेथून निघून गेले. त्यातील एकाचे नाव प्रवीण उर्फ राहुल फलके असल्याचे फिर्यादीला तेथे समजले असल्याचे त्यांनी फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रवीण उर्फ राहुल फलके याच्या सह इतर अनोळखी इसमांच्या विरुद्ध लुटमारीचा गुन्हा दाखल केला आहे.

# आपले एक निर्भीड आणि प्रामाणिक मत इतिहास बदलू शकते, क्षणात चित्र पालटु शकते

## धन दांडग्या आणि गुंडाड लोकांपुढे हाजी हाजी करून परत त्यांच्यापुढे नाचुन.. येऊन येऊन येणार कोण असे नारे देणारे तुम्हीच ना?

मतदार बंधू आणि भगिनींनो राजकारण आणि समाजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, याचं नैतिक संतुलन साधलेला निस्पृह आणि निष्पक्ष थोडाफार का होईना अभ्यास असलेला असा माणूसच खरा नेता असू शकतो, असं चाणक्य नीति मध्ये सांगितलेलं आहे,

या कसोटीवर १००% उतरणारा माणूस आजच्या या युगात अल्लाउद्दीन च्या दिव्या इतकाच दुर्मिळ आहे हे कबूल आहे, पण आपल्या सामान्य माणसांच्या अपेक्षा कितीतरी सामान्य दर्जाच्या असतात, म्हणून त्या सामान्य दर्जाच्या किमान अपेक्षा पूर्ण करणारा योग्य उमेदवार या कसोटीवर उतरणार हवा की नको?

आपल्याला आज पर्यंत आलेल्या सगळ्या प्रकारच्या अनुभवांमधून आपण सर्वजण सहज बोलताना असे बोलतो की जातीपातीचा द्वेष न करणारा, आपले मतदार हे आपले कुटुंब मानणारा, मदतीला धावणारा, वेळप्रसंगी एखादी गंभीर समस्या सोडवण्यासाठी स्वतःची प्रतिष्ठा आणि पद देखील पणाला लावणारा, सर्वांचे फोन उचलणारा, आणि मुख्य म्हणजे सभ्य भाषेत बोलणारा उमेदवार निश्चितच लोकांना भावतो.

पण आजकाल संपूर्ण राज्यभर देशभर नजर मारली तर गुंडांची दलालांची टोळी पाळुन प्रत्यक्ष अप्रत्यक्ष खंडणी गोळा करणारा.. गणपती, नवरात्राच्या नावाखाली चौका चौकात डीजे लावून सगळ्यांच्या कानठळ्या बसवणारा.. नट नट्या नाचवणारा, अलिशान मोटारी मध्ये दोन–चार कार्यकर्ते नावाचे पाळीव प्राणी घेऊन फिरणारा, दहशत करण्यासाठी ५–२५ गुन्हे ज्यांच्यावर दाखल झालेत असा...



आयुष्यात दुसरं तिसरं काही करताच आलं नाही.. शिकता आलं नाही.. धंदा करता आला नाही.. म्हणून शेवटचा उपाय म्हणून राजकारणात उतरलेला.. अशाच उमेदवारांची जंत्री दिसून येते. आणि असाच उमेदवार पुढे जाऊन मंत्री होतो.

**योग्य उमेदवार मतदार जागृती अभियान...**

वर्तमानपत्रात आलेल्या माहितीनुसार या निवडणुकीत प्रत्येक पक्षामध्ये ५० टक्क्याहून अधिक उमेदवार असे आहेत की ज्यांच्यावर अतिशय गंभीर गुन्हे दाखल आहेत.. हि आपल्या लोकशाहीची शोकांतिका आहे. निवडणुकीला उभे राहण्यासाठी एवढी मारामारी एवढे पक्ष पक्षांतर, केवळ लोकांचा सेवक म्हणजे आपला नोकर होण्यासाठी कोणी एवढी मरमर फुकट करेल का? जरा नजर मारा या आपला नौकर होऊ इच्छित असलेल्या देशभरातल्या उमेदवारांच्या स्थावर संपत्तीवर नजर मारा... कुठून आणि कशी मिळवली त्यांनी आणि त्यांना अजून काय मिळवायचे आहे?

**सुशिक्षित आणि सुज्ञ मतदारांनो...** मी आणि माझे चौकोनी कुटुंब, या चौकटीच्या बाहेर मला कशाचाही आणि कुणाचंही काही देणंघेणं नाही अशा प्रवृत्तीमध्ये आपण रोज वावरतो, जोपर्यंत थेट आपल्याला स्वतःला त्रास होत नाही, तोपर्यंत आपल्याला नेमक्या समस्या तरी काय आहेत हे सुद्धा माहीत नसतं, रोज आपण त्याच ट्रॅफिकमध्ये त्याच ठिकाणी अडकतो, तोच कचरा तुडवतो, त्याच खड्ड्यांमध्ये पडतो, रोज रात्री दोन वाजता पाणी भरायला उठतो, उद्यानांमध्येसुद्धा नाक दाबून जातो... या विषयी वर्तमानपत्रातल्या पोट तिडकीने लिहिलेल्या बातम्यासुद्धा आपण तितक्याच अलिप्तपणे वाचतो.. पण दारात पाया पडायला आलेल्या उमेदवाराला जाब विचारायची आपली हिम्मत नसते..

ही सगळी परिस्थिती बदलण्यासाठी आपल्याला शिवाजी महाराजांचा पुन्हा जन्म व्हावा असं वाटत असतं पण शेजाऱ्याच्या घरात आपल्या घरात नाही. कुठल्याही शेंदूर फासलेल्या दगडाला देव मानण्याची आपली वेडसर श्रद्धा, कमीत कमी तो दगडच आहे हे सिद्ध झाल्यावर तरी सोडून द्या, कुणाला संधी द्यायची? हा सर्वस्वी आपला निर्णय आहे..

आपले एक निर्भीड आणि प्रामाणिक मत इतिहास बदलू शकते क्षणात चित्र पालटु शकते हे नुकतेच काही ठिकाणी सिद्ध झाले आहे, असं हे आपलं बहुमोल मत आपण दोन पाच हजार रुपयांसाठी विकता कामा नये भावनेच्या आहारी जाऊन पक्षाच्या दावणीला आंधळेपणाने बांधून घेऊन धर्म जातीपातीच्या नावाखाली आपण आपलं आणि आपल्या पुढच्या पिढीचं नुकसान करून घेतो आहोत. पाच रुपयाची कोथिंबीर घेताना देखील आपण ती खालून वरून पाहून घेतो मग हे पाच वर्षांसाठी आपल्या डोक्यावर निवडून द्यायचं बुजगावणं आपण कसं निरखून घ्यायला हवं नाही का?

मित्रहो, तुम्ही म्हणाल की जगात असा सर्वगुणसंपन्न सदगुणांचा पुतळा कधी सापडेल का? बुद्धिमान सुशिक्षित सज्जन आणि पात्र लोक तर निवडणुकीला उभेही राहत नाहीत.. मग आम्ही काय करायचे? तुमचा प्रश्न रास्त आहे. पण त्या सज्जन माणसाचे असे मत होण्यासाठी पण तुम्हीच कारणीभूत आहात ना.. कारण तुम्हाला अशा धन दांडग्या आणि गुंडाड लोकांपुढे हाजी हाजी करून परत त्यांच्यापुढे नाचुन..

येऊन येऊन येणार कोण असे नारे देणारे तुम्हीच ना ?

अशा प्रश्नांचे साधक बाधक उत्तर देण्याचा या सदरातून प्रयत्न आहे म्हणून मतदानाला जाईपर्यंत हे सदर रोज वाचत रहा..

उद्याच्या अंकात योग्य उमेदवार या शब्दाच्या अजून जवळ पोहोचू या..

– **सुहास मुळे,** अध्यक्ष, जागरूक नागरिक मंच, मोबा. ९००२६६८५५५

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणीचा मृत्यू; बायपास रस्त्यावर नेप्ती शिवारातील घटना

नगर – अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना नेप्ती (ता. नगर) शिवारात कल्याण बायपास रस्त्यावर पुलाच्या पुढे घडली. माधुरी दत्तू गायकवाड (वय २९ रा. विश्वनयनराजे नगर, कांदा मार्केट रस्ता, केडगाव) असे मयत तरुणीचे नाव आहे.

या प्रकरणी त्यांचा भाऊ नीलेश दत्तू गायकवाड (वय १८, रा. भुषणनगर, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनावरील चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (दि.१०) सकाळी सहा वाजता ही घटना घडली. माधुरी गायकवाड या रविवारी सकाळी कल्याण बायपास रस्त्यावरून जात असताना पुलाच्या पुढे त्यांना अज्ञात वाहन चालकाने धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. वाहन चालक मदत न करता पसार झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गांगुर्डे करत आहेत.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २४ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



मुद्रित माध्यमांमध्ये जाहिरातीसाठी एमसीएमसी पूर्व प्रमाणिकरण अनिवार्य करण्यात आली आहे.

## मुद्रित माध्यमांमध्ये जाहिरातीसाठी एमसीएमसी पूर्व प्रमाणिकरण अनिवार्य

### मतदानाच्या दिवसापूर्वी व मतदानादिवशी काटेकोरपणे निर्देश पालनाच्या सूचना

नगर – भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या मतदान दिवसापूर्वी आणि मतदानादिवशी मुद्रित (प्रिंट) माध्यमातून कोणत्याही दिशाभूल करणाऱ्या किंवा द्वेषपूर्ण जाहिरातींमुळे कोणतीही अप्रिय घटना घडू नये, ज्यामुळे निवडणूक प्रक्रियेला अडथळा येईल, अशा जाहिराती प्रकाशित होऊ नयेत, याबाबत मुद्रित माध्यम व सर्व संबंधितांना दक्षता घेण्याबाबत निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोगाच्या या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

कोणताही राजकीय पक्ष, निवडणूक उमेदवार किंवा इतर कोणतीही संस्था किंवा व्यक्ती यांनी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या मतदानादिवशी २० नोव्हेंबर आणि मतदानाच्या एक दिवस आधी १९ नोव्हेंबर रोजी मुद्रित माध्यमांत कोणतीही राजकीय जाहिरात राज्य किंवा जिल्हा स्तरावरील माध्यम पूर्व प्रमाणिकरण समितीकडून पूर्व – प्रमाणित केल्याशिवाय प्रकाशित करू नये, अशा सूचना निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. संबंधितांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे जिल्हा निवडणूक प्रशासनाने कळविले आहे.

## धोंडीराम सुरसे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील मंगलगेट भागातील जे. जे. गल्लीत राहणारे धोंडीराम कुंडलीक सुरसे (वय ७८) यांचे १२ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विशाल, सचिन व नितीन सुरसे यांचे ते वडील होत.

## प्रवीण (विकी) चड्डा यांचे अल्प आजाराने निधन

नगर – एमआयडीसीमधील उद्योजक व ऑटोमोटीव्ह सेल्सचे संचालक प्रवीण (विकी) चड्डा (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, एक मुलगा व मुलगी असा परिवार आहे.



प्रवीण चड्डा हे पंजाबी सेवा समितीचे सदस्य प्रमोद चड्डा यांचे बंधू होत. अनेक सामाजिक कार्यात स्व.चड्डा यांचा पुढाकार असे. धार्मिक व मनमिळावू स्वभावामुळे ते परिचित होते.

## शोभा जाधव यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर – समतानगर बीएसएनएल ऑफिस जवळ सावेडी शोभा जाधव (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. शोभा जाधव ह्या अहमदनगर जिल्हा विद्या प्रसारक समाज या संस्थेच्या ज्येष्ठ सदस्य होत्या. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा सेवा संघाच्या त्या संस्थापक मार्गदर्शिका देखील होत्या, तसेच जिजाऊ ब्रिगेड च्या त्या माजी जिल्हाध्यक्ष देखील होत्या. तसेच दिवंगत ॲड. बाबासाहेब जाधव यांच्या पत्नी होत.



त्यांच्या मागे दोन मुले डॉ. मंगेश जाधव व सौरभ जाधव तसेच स्नुषा व नातवंडे आहेत. अंत्यविधी सायंकाळी सहा वाजता अमरधाम अहमदनगर येथे होत आहे.

## अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात दोन सत्रात निवडणूक प्रशिक्षण

नगर – अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेल्या आलेल्या मतदान अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी नंदनवन लॉन्स व भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे दोन सत्रात मतदान यंत्र हाताळणीबाबतचे प्रशिक्षण झाले. एकूण १ हजार ३१४ अधिकारी–कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले.

यावेळी निवडणूक निरीक्षक ताई के, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, निवडणूक निर्णय अधिकारी सुधीर पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय शिंदे उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या पहिल्या सत्रात निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना कायदेशीर प्रक्रिया माहिती पुस्तिकेचे अवलोकन करण्याबरोबरच प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. दुसऱ्या सत्रात भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे अधिकारी–कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी सात मतदान सुलभता केंद्रावर पोस्टल मतदानही घेण्यात आले.

# देशातल्या पहिल्या स्वीप केअर व्हॉट्सअॅप क्रमांकाची संकल्पना अनुकरणीय

## निवडणूक निरीक्षक श्रीमती रंजीता यांचे प्रतिपादन; ई–स्वीप साहित्य संकलित करण्यासाठी ९००२१०९००३ व्हाट्सअॅप क्रमांकाचा प्रारंभ

नगर – मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण स्वीप उपक्रम राज्यात चालू आहेत. यामुळे मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी मदत होणार आहे. सक्षम लोकशाही समृद्ध करण्याकरिता प्रत्येक मतदाराने महत्त्वाचे योगदान देणे गरजेचे आहे. याकरिता एक जिल्हा – एक व्हॉट्सअॅप नंबर या संकल्पनेवर आधारित अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीचा देशातला पहिला स्वीप केअर व्हॉट्सअॅप क्रमांकाचा प्रयोग हा इतरांसाठी निश्चितच अनुकरणीय आहे.यामुळे स्वीप उपक्रमांचे संकलन सुलभ व सोपे होणार आहे व संपर्क साधण्यासाठी हा प्रयोग फार महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन श्रीमती रंजीता यांनी केले.




ई–स्वीप साहित्य संकलित करण्यासाठी व्हॉटस्अॅप क्रमांकाचा प्रारंभ करताना निवडणूक निरीक्षक श्रीमती रंजीता. समवेत जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी अधिकारी, कर्मचारी.

सिद्धाराम सालीमठ (जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहिल्यानगर) यांच्या निर्देशानुसार वैशिष्ट्यपूर्ण स्वीप उपक्रम जिल्ह्यात वेग घेत आहेत. अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या ९००२१०९००३ या स्वीप केअर व्हॉट्सअॅप क्रमांक उपक्रमाच्या विमोचनप्रसंगी निवडणूक निरीक्षक श्रीमती रंजीता बोलत होत्या. यावेळी निवडणूक निरीक्षक हौलीनलाल गौईटे, अरुण कुमार, डी. रथ्ना, कविथा रामू, नागेंद्र नाथ त्रिपाठी, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, आशिष येरेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद),मनपा आयुक्त यशवंत डांगे, अशोक कडूस(स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी), डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत)आदी उपस्थित होते

संपूर्ण जिल्हाभरातील विविध प्रकारचे हजारो स्वीप उपक्रमांचे फोटो, कागदपत्रे, वृत्तपत्र कात्रणे, पीडीएफ डॉक्युमेंट्स, ऑडिओ–व्हिडिओ क्लिप्स, जिंगल्स, रिंगटोन एकाच ठिकाणी संकलित होऊन या साहित्याचा जिल्ह्याच्या सोशल मीडिया व्यासपीठावर प्रसारित करण्यासाठी तसेच भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी–महाराष्ट्र यांना उपक्रम अहवाल पाठवण्यासाठी या संकल्पनेचे उपयोजन होईल. फक्त ई–स्वीप साहित्य संकलित होणाऱ्या या क्रमांकामुळे लोकसभा निवडणुकीवेळी स्वीप उपक्रमांना चालना मिळाली. कुरियर/ पोस्ट अथवा समक्ष स्पर्धेचे साहित्य आणून देण्यात वेळ, इंधन खर्च होते. ऑनलाइन तंत्रज्ञान असताना या सर्व गोष्टींची बचत होते, असे प्रतिपादन अशोक कडूस यांनी केले.

# गृहिणी

## आरोग्य

### ...हे हलक्यात घेऊ नका

पोटाला सूज येत असेल, वजन कमी होत असेल वा थकवा जाणवत असेल तर हलक्यात घेऊ नका. ही गंभीर अशा 'इंफ्लेमेट्री बाउल डिसीज' (आयबीडी) ची लक्षणे असू शकतात. यावर वेळीच उपचार न केल्यास कर्करोग होण्याची शक्यता असते. 'त्याची सुरुवातीची लक्षणे खूप सामान्य असल्यामुळे कोणीही गांभीर्याने घेत नाही. याखेरीज लक्षणे मूळव्याधाशी जुळत असल्याने अनेक वेळा लोक मूळव्याधवर उपचार करू लागतात. यासाठी तज्ज्ञ वैद्यकीय सल्लागारांकडून वेळीच उपचार करुन घ्यावेत.

## पाककला

### गव्हाचे अनरसे

**साहित्य** : गहू, चिरलेला गूळ अगर दळलेली साखर, तूप, खसखस.

**कृती** : गहू पाण्यात भिजत घालून तीन दिवस ठेवावेत. नंतर गहू वाटून व फडक्याने गाळून सत्त्व काढून घ्यावे. सत्त्व थोडे सुकत ठेवावे. थोडेसे कोरडे झाल्यावर तितकाच गूळ अगर दळलेली साखर घ्यावी व सत्त्व व गूळ अगर साखर ताटात निरनिराळे ठेवावे. प्रथम दोन-तीन अनरशांपुरतेच सत्त्व व गूळ अगर साखर घेऊन, एकत्र करून, चांगले मिसळावे. त्यांतील एक गोळी घेऊन, त्याचा खसखशीवर अनरसा थापावा व लगेच तळणीतून तळून काढावा.

याप्रमाणेच बाकीचे सर्व अनरसे करावेत. हे तांदळाच्या अनरशांसारखे होतात. जरा जाड होतात.

## वास्तू

### आदर्श लिव्हींग रुम

* आपल्या जन्मतारखेनुसार आपल्या अनुकूल दिशेने लिव्हिंग रूम बनवण्याचा प्रयत्न करा.

* उत्तरेकडील लिव्हिंग रूम घरातील लोकांसाठी धन आणि उत्तम आरोग्य ठेवण्यास मदत करते.

* लिव्हिंग रूमचा मजला आणि सिलिंग याचा उतार पूर्व किंवा उत्तर दिशेने असला पाहिजे.

## सल्ला

मनीप्लांटला मनी मॅग्नेट म्हणून ओळखले जाते. मनी प्लांट व्यवसाय, पैसा आणि विकासामध्ये यश मिळवते. यामुळे घरात एखादा तरी मनीप्लँट लावावा.

## सौंदर्य

एका भांड्यात दोन ते तीन स्ट्रॉबेरी मॅश करा आणि त्यात एक चमचा दही घाला आणि ही पेस्ट चेहऱ्यावर लावा. दही आणि स्ट्रॉबेरी हे मिक्स करून चेहऱ्यावर लावल्याने त्वचा टवटवीत राहते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १३ नोव्हेंबर २०२४

**प्रदोष, तुलसी विवाहारंभ, चातुर्मास्य समाप्ति, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, कार्तिक शुक्लपक्ष, रेवती २७।११ सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. २६ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : योजनेचे क्रियान्वयन आवश्यक. वाहने व उपकरणे बिघडतील.

**वृषभ** : अध्यात्मिक क्षेत्राकडे आपण आज वाटचाल कराल. हितशत्रुंकडून त्रास संभवतो.

**मिथुन** : कामे अपुरी राहतील. खर्चाची चिंता राहील. सांगण्यावर विश्वास ठेवू नका.

**कर्क** : खर्च होईल. अडकलेल्या कामात सुधारणा होईल. वाहन व गृहखरेदीसाठी चांगला दिवस.

**सिंह** : कायदेशीर कामात आत्मविश्वास कमी राहील. मागील केलेले संकल्प आज पुर्णत्वास येतील.

**कन्या** : आपल्या विवेकबुध्दीच्या उलट काम झाल्याने हानि होऊ शकते.

**तूळ** : आपल्या यशाचा मूळ मंत्र कोणत्याच कामाला अशक्य न समजणे आहे.

**वृश्चिक** : कामे कौशल्यपुर्ण करावी लागतील. दिवस प्रसन्नतेत जाईल. मातृचिंता सतावेल.

**धनु** : भाऊबंद डोके वर काढण्याची शक्यता आहे. दिवस कालच्या दिवसाइतका आनंदी जाणार नाही.

**मकर** : जुने मित्र-मैत्रिणी भेटतील. दिवस आनंदात व्यतीत होईल.

**कुंभ** : पितृचिंता सतावेल. धाकट्या भावंडांची शैक्षणिक चिंता राहिल.

**मीन** : गुरुजनांचे मार्गदर्शन लाभेल. इतरांची देणी आपण परत कराल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक - तू शाळेत कशासाठी येतोस?
धोंडू - विद्येसाठी
शिक्षक - मग तू आज वर्गात झोपला का होतास?
धोंडू - आज विद्या आली नाही ना!

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* ध्वनीप्रदूषण मोजण्याचे परिमाण कोणते? - डेसिबल
* रामटेक तालुक्यात कोणता तलाव आहे? - खिडसी
* ग्रँडमास्टर किताब कोणत्या खेळाशी संबंधित आहे? - बुद्धिबळ
* सेवाग्राम कुठल्या जिल्ह्यात आहे? - वर्धा

- **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०४८ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | ■ |
| ६ | | ■ | ७ | | | | |
| ८ | | ■ | | ■ | ९ | | ■ |
| | ■ | १० | ■ | ११ | ■ | ■ | १२ |
| १३ | १४ | | १५ | ■ | १६ | | |
| ■ | १७ | | | | | ■ | |
| १८ | | | ■ | ■ | १९ | २० | ■ |
| २१ | | ■ | २२ | | | | |

**आडवे शब्द :-** १) गर्विष्ठ ४) अशा प्रकारचा; असला ६) माळ; माला; सर ७) अल्प काळात नष्ट होणारे किंवा अल्प काळ टिकणारे ८) ललाट; कपाळ ९) वेग; स्पीड ११) आण्याचा बारावा अंश १३) एक शस्त्र; समशेर १६) एक धान्य १७) वडिलोपार्जित चालत आलेल्या संपत्तीचा हक्कदार किंवा उत्तराधिकारी १८) धोबी; परीट १९) दबाव; दडपण; वजन २१) गोळा झालेले; आय; प्राप्ती २२) सारख्या स्वभावाचा

**उभे शब्द :-** १) कौरव-पांडवांची कथा २) विष; जहर; सापाचे विष ३) रक्षण करणारा ४) तुकाराम महाराजांचे भक्तिकाव्य ५) एक मांसाहारी खाद्यपदार्थ १०) निवारण करणारा १२) भारतातील दोन खरीप पीक हंगामांपैकी एक १४) मागे असलेले नोकरचाकर, गाडीघोडे वगैरे १५) स्वाद; गोडी; चव १६) सामान ज्यात बांधतात ते कापड अथवा गोणपाट १८) तीन गुणांपैकी एक; धूळ २०) चहा पिण्याचे एक भांडे

### शब्दगंध क्र. ७०४७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | रे | मा | प | ■ | आ | ग | र |
| क | ल | ■ | त | पा | स | नी | स |
| स | चे | त | न | ■ | रा | म | ■ |
| ■ | ल | ड | ■ | आ | ■ | ■ | स |
| पा | ■ | फ | की | र | ■ | ग | र्व |
| स | व | ड | ■ | स | त | र्क | ■ |
| वा | र | ■ | दु | पा | र | ■ | सा |
| न | वा | र | ■ | नी | ल | ग | य |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : टीका करणाऱ्या शत्रूंपेक्षा दिखाऊ स्तुती करणाऱ्या मित्रांपासून सावध रहा.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## सिमेंट काँक्रीटचा शोध कोणी लावला?

पर्यावरणाबद्दल बोलत असताना एक वाक्य नेहमी ऐकायला मिळतं, खरी जंगलं जाऊन काँक्रीटची जंगलं उभी राहिली आहेत. सिमेंट आणि त्यापासून तयार होणाऱ्या काँक्रीटचा शोध लागला नसता, तर आपण आजही दगड-मातीच्या घरात राहात असतो. उंच आणि मजबूत इमारती बांधणं शक्य झालं नसतं आणि आजची अत्याधुनिक अवाढव्य शहरं दिसली नसती. सिमेंट-काँकीटमुळे केवळ बिल्डिंगच नव्हे तर मोठमोठाले पूल, रस्ते, धरणं बांधणं शक्य झालं. म्हणजे एका प्रकारे विचार केला तर मनुष्याच्या भोवतालचं जग आज काँक्रीटनेच बनलेलं आहे. अर्थात काँक्रिटशिवाय झालेली अनेक मोठाली बांधकामं आहेत. मग ते इजिप्तचे पिरॅमिड असोत वा आग्र्याचा ताज महाल, पण आधुनिक बांधकामयुगाची आणि तंत्राची पायाभरणी १८२४ साली जोसेफ एस्पडिन नावाच्या एका इंग्रज माणसानं पोर्टलँड सिमेंटचा शोध लावल्यानंतर झाली असं म्हणायला हरकत नाही.

## सद्विचार

एक रामपूर नावाचे गाव होते. त्या गावा शेजारी खूप मोठे जंगल होते. त्या गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी त्या जंगलातून जावे लागत असे. अतिशय गरज असेल तेव्हाच लोक शेजारच्या गावात जात असे. त्यामुळे हे जंगल निर्जन होते. जंगलात फक्त जंगली प्राणी असायचे. जंगली प्राण्यामुळे लोकांना आज पर्यन्त कधीच त्रास झाला नव्हता.

एकदा एक गरीब माणूस जंगलातून फिरत चालला होता. जंगलात दूरवर आणि त्याच्या सोबत कोणीही नव्हते.बरेच अंतर पार केले असताना तो खूप थकला होता. आणि त्याला खूप तहान लागली होती आणि भूकही लागली होती, एक डेरेदार झाड पाहून तो त्याच्या खाली बसला आणि विचार करु लागला कि आपल्याला इथे कोणी मिष्टान्न भोजन व थंडगार पाणी आणून देईल तर किती बरे होईल ? योगायोगाने तो ज्या झाडाखाली बसला होता तो होता कल्पवृक्ष. त्याने इच्छा केल्याबरोबर ती पूर्ण झाली. आणि त्याच्या पंच पक्वानाचे जेवण प्रकट झाले. त्या माणसाला वाटले कि बहुधा देवच प्रसन्न झाला असावा. त्याने प्रार्थना केली कि मला पोते भरुन मोहरा मिळाव्यात म्हणजे माझे दारिद्र्य नाहीसे होईल. तीही इच्छा लगेच पूर्ण झाली. इतक्या मोहरा त्याने आयुष्यात पाहिल्याही नव्हत्या. पण आता त्याला भीती वाटू लागली.

या मोहरांच्या लोभाने चोर इथे आले तर काय करायचे ? ते धन तर लुटून नेतीलच, पण आपल्यालाही ठार मारतील. हे मनात येताच तिथे चोर आले. आणि त्यांनी मोहरांची पिशवी उचलली आणि त्या गरीब माणसाला ठारही केले. कल्पवृक्षाचे सामर्थ्य न कळल्याने तो हकनाक मरण पावला.

**तात्पर्य** - आपल्याला मिळणाऱ्या अनुभवाचा जरूर विचार करावा. एखादी संधीचा चांगला उपयोग करून घ्यावा त्या संधीमुळे आपले नुकसान तर होणार नाही असे काही करु नये.



# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

अपने बनाये हुए स्वर्ग संसार में बसता है चाहे यह अपने-अपने मन मसाले की पैदावार होने के कारण कम गहरा, छिछला या सीमित होता है। परन्तु इस मायावी वातावरण में रहते हुए भी इसे सचाई की समझ होती है।

मानसिक संसार में एक विशेष आकर्षण लोक देव लोक है। अपने समय के बड़े-बड़े विद्वान अपनी खोजों में बहुत आगे जा चुके लोग यहाँ रहते हैं। हिन्दुओं के स्वर्ग या वैकुण्ठ, बोद्धियों की सुखवती, पारसी और ईसाइयों के (स्वर्ग), मुसलमानों के अर्श, बाद के यहूदियों के उच्चतम बहिशत यहाँ ही स्थित हैं । अदन का बाग, जहाँ आदम को परमात्मा की आज्ञाओं का उल्लंघन करने के कारण बाहर निकाल दिया था, यहाँ ही स्थित हैं। अपने समय के प्रसिद्ध कवि और पूर्ण बुद्धिमान प्रतीभाशाली जॉन मिलटन (१६०८-७४) ने अपनी अमर रचनाओं (कविताओं) स्वर्ग का खोना और स्वर्ग की दोबारा प्राप्ति में इन्सान के गिरने और परमात्मा के पुत्र द्वारा इसके दोबारा जीवित होकर, परमात्मा के साथ जाकर मिलने का एक बड़ा विचित्र दृश्य पेश किया है।

### जीवन की रोशनी

मौत के बाद, मनुष्य के भिन्न-भिन्न लोकों में अस्तित्व से संबंधित भिन्न-भिन्न धर्मों के ग्रन्थों में और आगे न जाते हुए यदि हम दोबारा ब्रह्म विद्या की ओर मुड़ें जिसे यूनानियों ने ठीक ही थ्योसोफिया कह कर बयान किया है और जो पूर्व और पश्चिम की सूझ-बूझ को अपने आँचल (झोली) में छिपाकर बैठी है। गुप्त विद्या की माहिर श्रीमती ऐनीबेसेंट की ओर दोबारा लौट कर हम देखते हैं कि मानसिक लोक में वे लोग रहते हैं जो अपने स्थूल और सूक्ष्म जिस्म को उतार चुके होते हैं। स्वार्थी, पशुत्व से शुद्ध होकर ये अपनी व्यक्तिगत इच्छाओं, अस्थिर इच्छाओं, आशाओं और भय, प्यार और आकर्षणों के शुभ विचारों की मात्रा अनुसार किये छोटे या बड़े शुभ कर्मों की फसल काटते हैं। हमारी फसल हमारे बीज के अनुसार होती है। हम जो हैं इससे अधिक प्राप्त नहीं कर सकते। धोखे में न रहना। परमात्मा को धोखा नहीं दिया जा सकता, एक आदमी जो बोता है, वही काटता है। (बाईबल)

यह शुभ कर्मों का फल भोगने वाले लोगों की सृष्टि है। अच्छे का फल अच्छा, दया से ओत-प्रोत इस सिद्धान्त द्वारा हर एक को इस धरती पर किये अपने कर्मों का बिल्कुल सही फल मिलता है। हर सोची समझी वस्तु मिल जाती है। हर इच्छा-शक्ति में निराशा भरे असफल यत्न समर्था में, संघर्षों और पराजयों, शक्ति स्तम्भ रूप में और दुखों, कष्टों और गलत कुठाली में ढलकर चमक मारते कवच में बदल जाते हैं। इन सभी का फल, सात उपलोकों में किसी एक उपलोक या स्वर्ग में मिलता है। यह आधी रात के सूरज की धरती है जहाँ आत्म चेतनता जागृत होकर आत्मा को उसके निज रहित आस-पास का पूरी तरह अनुभव करवा देती है। स्मरण शक्ति दूर अनजाने भूतकाल तक फैल जाती है और इसके धरती पर जन्म लेने के कारणों और आने वाले विशाल भविष्य को बनाने वाले उसके कर्म उसे स्पष्ट दिखाई देने लग जाते हैं। भूत, भविष्य और वर्तमान एक खुली किताब, एक अटूट दृश्य जिसमें कुछ भी अनजाना नहीं होता, की तरह उसके सामने होते हैं। यहाँ इसकी अन्तर दृष्टि का विकास होता है और जहाँ तक इसके व्यक्तिगत का संबंध है, यह सही अर्थों में सिद्ध पुरुष बन जाता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

को थोड़ा सा सहयोग करती हैं ताकि शरीर अपना इलाज खुद कर सके। तभी कहते हैं हीलिंग भगवान से आती है। भगवान की याद से भी रोग ठीक होते हैं। इसलिए कोई भी रोग हो जाए। उसकी दवाई जरूर लेनी है। शरीर को जल्दी ठीक करने के लिये पार्किंसन के नियम का लाभ लो। चाहे कितना भी शरीर में कष्ट हो सोचते रहो मैं ठीक हो रहा हूं। कोई पूछे केसे हो तो कहो पहले से ठीक हूं। सिर्फ वह व्यक्ति जो आप के इलाज में मदद कर रहा है उसे या अपने डॉक्टर को ही रोग के बारे सही सही बतायें। हर रोज बीमारी के बारे कुछ न कुछ जरूर पढ़ा करो। शरीर में एक ऐसा केंद्र है जहां हम पूर्ण स्वस्थ हैं। जब भी कोई रोग हो तब कहते रहो ऐ मन वहां चल जहां संपूर्ण स्वास्थ्य है। आप का मन वहां चला जाएगा और आप स्वस्थ होते जाएंगे। पार्किंसन का नियम कहता है कि शरीर को ठीक करने के लिये मन को एक फिक्स समय दो। मन में सोचो कि मेरा रोग एक अगस्त २०२१ तक ठीक हो जाएगा। अगर एक अगस्त तक ठीक नहीं होता तो डेट आगे बढ़ाते रहो। शरीर को ठीक करने के लिये पर्याप्त समय दो। हमें पता है जुकाम या बुखार आदि आने पर उसे ठीक होने में लगभग एक सप्ताह लग

### अंतरीक बल

जाता है। डाक्टर हमें बता देता है कि किस रोग को ठीक होने में कितना समय लगता है। आप ने दिमाग को उतना समय देना है। आवश्यकता अनुसार तिथि बढाते रहो।

ऐसे ही बाबा या ईष्ट को सामने देखते हुए किसी भी रोगी को तय किये गये समय में ठीक करने के लिये प्रार्थना करते रहो या संबन्धित रोगी को तरंगें देते रहो वह ठीक हो जाएगा।

स्वयं प्रबन्धन दूसरो 'दबाव से या आप की स्व प्रेरणा से आता है। आप के आर्थिक लक्ष्य आप को निरंतर प्रेरित करते हैं कि आप अपनी वर्तमान अवस्था को बदल लें। धन कमाना हरेक व्यक्ति का मुख्य लक्ष्य है। अपनी आर्थिक स्थिति को बेहतर बनाने का काम आप को खुद ही करना होगा। दूसरो को क्या पड़ी है, जो आप के जीवन को बेहतर बनाने के लिये आप पर दबाव डालें। आदमी घड़ी में चाबी भरता है तो घड़ी को नहीं अपनी आवश्यकता के लिये भरता है। जब आप आर्थिक सफलता की डगर पर बढ़ोगे तो बहुत सी बाहरी बाधाएं आप की प्रगति में रुकावट डालेंगी, आप का समय नष्ट करेंगी।

अगर आप कोई ऐसी वैसी बात सुनेंगे तो एक घंटा याद रहेगी, यदि देखेंगे तो एक दिन तक याद रहेगी, लेकिन करेगें तो हमेशा याद रहेगी। इस तरह आप का समय नष्ट होता रहेगा। अगर आप समय बचाना चाहते हैं तो आप को अपने खुद के तथा दूसरो के व्यर्थ संकल्प, व्यर्थ बोल और व्यर्थ कर्म के प्रभाव से बचाना है। सबसे ज्यादा विपरीत लिंग के प्रति बुरे आकर्षण से बचने के लिये अपने पर कड़ा पहरा देना है। सावधानी हटी तो दुर्घटना घटी, ये याद रखना है। यदि आप अच्छे योगी बनना चाहते हैं या खूब धन कमाना चाहते हैं तो ज्ञान, योग व लौकिक शिक्षा व लौकिक कार्य पर ही अपने को अनुशासित करें। इस से आप का व्यर्थ जाने वाला समय बचेगा। बाकी चीजें आप का इंतजार कर सकती हैं। मन ही मन दोहराते रहो कि प्रसन्नता अधिक प्रसन्नता को लाती है। आनंद अधिक आनंद को, शांति अधिक शांति को, कृतज्ञता अधिक कृतज्ञता को, दयालुता अधिक दयालुता को और प्रेम अधिक प्रेम को आकर्षित करता है। आप का काम अंदरूनी है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**चौथा महिना** : या महिन्यामध्ये सायीच्या दह्याच्या ताकाचे काढलेले लोणी एक तोळा या प्रमाणात सेवन करावे.

**पाचवा महिना** : सायीच्या दह्याच्या ताकापासून काढलेल्या लोण्यापासून तूप तयार करावे व ते तूप सेवन करावे. **सहावा व सातवा महिना** : या महिन्यामध्ये देखील मधुर औषधांनी सिद्ध केलेले दूध प्यावे तसेच लोण्यापासून तूप काढून ते सेवन करावे. मधुर, वातनाशक असे पदार्थ अल्पप्रमाणात सेवन करावेत. त्यात मीठ असू नये. पाणी थोडे थोडे प्यावे. **आठवा महिना** : या महिन्यामध्ये दुधामध्ये सिद्ध केलेली यवागु (पेज) पिण्यास द्यावी. **नववा महिना** : या महिन्यामध्ये मधूर औषधांनी सिद्ध केलेल्या तेलाचा अनुवासन बस्ती द्यावा. याच तेलाने भिजविलेला पिचू योनीमार्गामध्ये ठेवावा, यामुळे गर्भाशयाचे, योनीमार्गाचे स्नेहन होऊन तो मृदू होतो व सुलभ, नैसर्गिक प्रसूतीसाठी त्याचा उपयोग होतो.

**नवनीत घृतक्षीरै** : सदा चैनामुपाचरेत् ।। थोडक्यात काय तर चरकाचार्यांनी आपल्या घरामध्ये होणाऱ्या दूध, तूप, लोणी, मऊ भाताची पेज यांचा वापर गर्भवतीच्या परिचर्येमध्ये करण्यास सांगितले आहे.

### गर्भाच्या मासानुमासिक वाढीसाठी उपयुक्त आयुर्वेदिक उपचार

**५) पाचवा महिना** : सायीच्या दह्याच्या ताकापासून काढलेल्या लोण्यापासून तूप तयार करावे व ते तूप सेवन करावे.

**६) सहावा व सातवा महिना** : या महिन्यामध्ये देखील मधुर औषधांनी सिद्ध केलेले दूध प्यावे तसेच लोण्यापासून तूप काढून ते सेवन करावे. मधुर, वातनाशक असे पदार्थ अल्पप्रमाणात सेवन करावेत. त्यात मीठ असू नये. पाणी थोडे थोडे प्यावे.

**७) आठवा महिना** : या महिन्यामध्ये दुधामध्ये सिद्ध केलेली यवागु (पेज) पिण्यास द्यावी.

**८) नववा महिना** : या महिन्यामध्ये मधूर औषधांनी सिद्ध केलेल्या तेलाचा अनुवासन बस्ती द्यावा. याच तेलाने भिजविलेला पिचू योनीमार्गामध्ये ठेवावा, यामुळे गर्भाशयाचे, योनीमार्गाचे स्नेहन होऊन तो मृदू होतो व सुलभ, नैसर्गिक प्रसूतीसाठी त्याचा उपयोग होतो.

**''नवनीत घृतक्षीरैः सदा चैनामुपाचरेत् ।।''**

थोडक्यात काय तर चरकाचार्यांनी आपल्या घरामध्ये होणाऱ्या दूध, तूप, लोणी, मऊ भाताची पेज यांचा वापर गर्भवतीच्या परिचर्येमध्ये करण्यास सांगितले आहे.

पाळीची तारीख चुकल्यानंतर पहिल्या आठ दिवसांमध्ये Pregnancy Test पॉझिटिव्ह येते. याच काळात पाळीची तारीख चुकल्यानंतर डॉक्टरांकडे जाऊन यावे. कोणता आहार घ्यावा, कोणती योगासने करावीत याबद्दलचे मार्गदर्शन घ्यावे. बऱ्याच जणींना दुसऱ्या महिन्यामध्ये उलट्यांचा त्रास होत राहतो. पाणीदेखील पचत नाही, याची कल्पना डॉक्टरांना देऊन त्या पध्दतीने औषधे घ्यावीत; परंतु औषध घेऊन देखील काही जणींना उलटी व मळमळीचा त्रास होत असतो. त्याकरिता काही पथ्ये पाळण्याची गरज असते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



अहमदनगर जिल्हा बँक असोसिएशन तर्फे जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँकांसाठी कर्ज वसुली व्यवस्थापन या विषयावर शिर्डी येथे आयोजिलेल्या ज्ञानसत्रामध्ये मार्गदर्शन करताना बँक असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा आदी.

# बँका सुदृढ ठेवण्यासाठी योग्य कर्ज वसुली व्यवस्थापन गरजेचे

### चेअरमन सत्येन मुंदडा यांचे प्रतिपादन

नगर – बँक आर्थिक दृष्ट्या सुदृढ व सक्षम ठेवण्यासाठी कर्ज वसुलीचे योग्य नियोजन करणे खूप आवश्यक आहे असे ज्ञानसत्राच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा बँक असोसिएशनचे चेअरमन सत्येन मुंदडा यांनी सांगितले. कर्ज खाते थकीत होणार नाही व कायद्याच्या चौकटीत राहून कर्ज वसुली करून आपल्या बँकेचा फायदा करून द्यावा असे आवाहन उपस्थित बँकेच्या प्रतिनिधींना केले.

अहमदनगर जिल्हा बँक असोसिएशनतर्फे जिल्ह्यातील सर्व नागरी सहकारी बँकांसाठी कर्ज वसुली व्यवस्थापन या विषयावर शनिवार हॉटेल टेम्पल ट्री, शिर्डी येथे ज्ञानसत्राचे आयोजन केले होते. या ज्ञानसत्रात जिल्ह्यातील २० बँकांचे एकूण ४५ प्रतिनिधी उपस्थित होते.

पुणे येथील कर्ज वसुली व्यवस्थापन तज्ज्ञ राजेश यादव सर हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते व जंगली महाराज आश्रम ट्रस्ट चे विश्वस्त माधवराव देशमुख व वसंतराव आव्हाड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे माधवराव देशमुख यांनी बँकेच्या प्रगती करिता बँकेचे कर्जदार, अधिकारी व व्यवस्थापन यांच्यामध्ये विश्वास व उत्तम समन्वय असणे खूप आवश्यक आहे असे सांगितले.

प्रशिक्षक राजेश यादव यांनी अतिशय सोप्या भाषेत कर्ज खाते कसे थकणार नाही व कर्ज देताना घ्यावयाची काळजी, करावयाचे करार, तसेच कर्ज वसुलीचे विविध कायदे व उपलब्ध पर्याय याबद्दल उत्तम मार्गदर्शन केले.

या ज्ञानसत्रामध्ये सर्व सहभागी बँक अधिकाऱ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानसत्राचे समन्वयक बारामती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी नवनाथ जगताप, असोसिएशनचे श्री. काकडे व सौ. पूनम बुरा मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नवनाथ जगताप यांनी केले.

# 'तिरूपती देवस्थान'च्या विश्वस्तपदाची हॅटट्रिक ही 'श्री बालाजी' यांचीच कृपा

### उद्योजक सौरभ बोरा




तिरूपती बालाजी देवस्थानच्या विश्वस्तपदाची हॅट्रीक पूर्ण करणारे सौरभ बोरा यांच्या बडी साजन मंगल कार्यालयात मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला.

नगर – तिरूपती बालाजी देवस्थानच्या विश्वस्तपदाची हॅट्रीक करता येणे ही बालाजींची कृपाच होय, अशा शब्दात उद्योजक सौरभ बोरा यांनी भावना व्यक्त केली.

सौरभ बोरा यांची तिरूपती बालाजी देवस्थानच्या विश्वस्तपदी सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल येथील बडीसाजन मंगल कार्यालयात सौरभ बोरा मित्र परिवारातर्फे आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. आशिष खंडेलवाल व सौ. अर्चना खंडेलवाल यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. अरूण जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार मातोश्री श्रीमती प्रमिलाताई बोरा यांचेसह करण्यात आला. पेढे तुलाही करण्यात आली. संजय ताथेड यांच्या हस्ते अरूण जगताप यांचा सत्कार करण्यात आला.

मर्चन्टस् बँकेचे व्हा. चेअरमन अमित मुथा यांनी स्वागत व प्रास्तविक करताना सौरभ बोरा यांचे तिरूपती बालाजी देवस्थानच्या विश्वस्तपदी सलग तिसरे वेळी त्यांची निवड होणे हा नगरच्या अभिमानाचाच विषय आहे, असे सांगितले.

अरूण जगताप यांनीही सौरभ बोरा यांच्या निवडीचे भरभरून कौतुक करताना त्यांना देवस्थानच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सी.ए.रविंद्र कटारिया, डॉ.अरूणा फिरोदिया (सातारा), वैशाली चोपडा, अनिल पोखरणा, राजेंद्र चोपडा, रविंद्र कटारिया यांनी सौरभ बोरा यांचे कार्य शहरवासियांसाठी अभिमानाचेच असल्याने या नागरी सत्काराचे आयोजन केले असे सांगताना मुंबईत वास्तव्यास असूनही नगरवर असलेले प्रेम विविध प्रसंग सांगत दाखवून दिले.

सत्कारास उत्तर देताना सौरभ बोरा म्हणाले, माझ्यावर कायम पुत्रवत प्रेम करणारे अरूणकाका जगताप तसेच उपस्थित सर्वच माझे वडिलधारी, मित्र परिवार यांनी इतका देखणा सोहळा आयोजित करून माझा सत्कार केला. हा सत्कार माझ्यासाठी माझ्या परिवाराने केलेला सत्कारच आहे. मी जरी ३० वर्षांपासून मुंबईत वास्तव्यास असलो तरी माझे श्रद्धास्थान नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज आहेत.

तिरूपती बालाजी भगवानची विशेष कृपा अनुभवतो आहे. जागतिक तीर्थस्थळ तिरूपती बालाजी देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तपदी सलग तिसऱ्यांदा संधी मिळणे ही साक्षात बालाजी भगवान यांचीच कृपाच होय. कारण देवस्थानवर फक्त दोनदाच ट्रस्टी होता येते. आंध्रप्रदेश सरकारच्या विशेष सेक्शन ५४ नियमानुसार मला ही संधी देण्यात आली. अशी संधी मिळालेला महाराष्ट्रातील मी एकमेव आहे. देशभरातून अनेक दिग्गजांनी विविध व्यक्तींसाठी शिफारशी केल्या होत्या. यातूनही मला संधी मिळाली. यात आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले. मला स्वतःला ही निवड खूप आनंद देणारी वाटते. शेकडो वर्षांपासून बालाजी भगवान तिरूपती येथे साक्षात वास्तव्यास आहेत ही भाविकांची श्रद्धा आहे. याठिकाणी प्रत्येकाची मनोकामना निश्चितच पूर्ण होते. जगभरातील भाविक या सर्वात मोठ्या देवस्थानला आवर्जून दर्शनासाठी येतात. कोट्यवधी भाविकांची व्यवस्था करणे, त्यांना लाडू प्रसाद देणे अशा व्यवस्थापनाचे नियोजन ट्रस्टी म्हणून करताना खूप समाधान लाभते. यापूर्वी ट्रस्टी म्हणून काम करताना मी माझ्या नगरच्या भाविकांच्या दर्शनाची कायम चांगली व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला. यापुढेही माझा हा प्रयत्न कायम राहील. कारण नगरकरांनी कायम माझ्यावर प्रेम केले आहे. मागील वर्षी मी नगर शहरात बालाजी कल्याणक उत्सव आयोजित केला. जवळपास ५० हजार भाविकांनी या उत्सवाला उपस्थित राहून बालाजी भगवान यांचे आशीर्वाद मिळवले. हे पुण्यकर्म आणि भाविकांचे आशीर्वादच मला ऊर्जा देणारे ठरले. भगवान बालाजींवरील भाविकांची श्रद्धा पाहता लवकरच मुंबईत बालाजींचे भव्य मंदिर मी उभारणार आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जवळपास २३० कोटी रुपयांची ५ एकर जागा मंजूर केली आहे. याशिवाय आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी माझ्यावर परदेशात बालाजी मंदिर उभारण्याची विशेष जबाबदारी सोपवली आहे. आपल्या सर्वांच्या सदिच्छा असल्याने मी यात नक्कीच यशस्वी होईल असा विश्वास आहे. आज नगरच्या माझ्या माणसांनी माझा सन्मान करून मला लाखमोलाचा आशीर्वाद दिला आहे. हा कौटुंबिक सत्कार मला भविष्यात आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देईल, असे सौरभ बोरा यांनी सांगितले.

कार्यक्रमास महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, बेंगलोर, सुरत अशा विविध भागांमधील बालाजींचे भक्त आणि नगर शहरातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सूत्रसंचलन प्रसाद बेडेकर यांनी केले. संजय ताथेड यांनी आभार मानले.

उपस्थित सर्वांना बालाजींच्या लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# रामचंद्र खुंट श्री स्वयंभू शनी मंदिरात १००१ दिव्यांनी 'दीपोत्सव' साजरा

नगर – दिवाळीमध्ये दीपोत्सव ला खूप महत्त्व आहे. भगवान श्री रामाने अहंकारी रुपी रावणाचा वध केला व आयोध्याला परतले. वाईट गोष्टींवर चांगल्या गोष्टींनी विजय मिळवला.या दिवसापासून दीपावली साजरी केली जाते. जीवनातील अंधकार दूर करण्यासाठी दीपोत्सव सर्वत्र साजरा केला जातो.

रामचंद्र खुंट परिसरातील शनि गल्ली येथिल पुरातन श्री स्वयंभू शनि मारुती मंदिरात सालाबाद प्रमाणे दीपोत्सव उत्साहाने साजरा करण्यात आला. मंदिरात आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. तसेच मंदिरात १००१ दिव्यांनी दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

यावेळी शनी मंदिराचे पुजारी ओम पांडे, बापू ठाणगे, संजय जोशी, महेंद्र चंदे, महेश बेद्रे, बाली जोशी, जयसिंग थोरात, भारत थोरात, दीपक दायमा आदि उपस्थित होते.



दिवाळीनिमित्त रामचंद्र खुंट येथील श्री स्वयंभू शनी मंदिरात करण्यात आलेला दीपोत्सव.

# मौलाना आझाद यांनी देशाच्या फाळणीला विरोध दर्शविला होता

### अभिजीत वाघ यांचे प्रतिपादन



मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व मराठी सेवा संघाच्यावतीने स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना इंजि. अभिजित वाघ. समवेत प्रा.डॉ. मेहेबूब सय्यद, डॉ. उमर सुरूर आदी.

नगर – भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदर ज्या घडामोडी घडत होत्या त्यावर मौलाना आजाद यांची करडी नजर होती आज घडणाऱ्या कोणत्या बाबींचा भविष्यात काय परिणाम होऊ शकतो हे ते समजून होते. देशाच्या फाळणीला त्यांनी कडाडून विरोध दर्शविला होता व तो शेवटपर्यंत कायम राहिला. त्यांनी इतर नेत्यांनाही फाळणी न करण्याची विनंती केली होती. पण शेवटी जे नाही घडायला पाहिजे होते ते घडलेच देशाची फाळणी झाली व देशात दंगली उसळल्या. माणूस माणसाकडे माणूस नाही तर जात म्हणून बघायला लागला हे मौलानांना सहन होत नव्हते. लोकांना शांत करण्यासाठी त्यांच्या मनातील फाळणीच्या दुःखाला व देशात पसरलेल्या दंगली व जातीवादाला संपविण्यासाठी मौलाना आजाद यांनी भरपूर प्रयत्न केले, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे महानगर अध्यक्ष इंजि. अभिजीत एकनाथ वाघ यांनी केले.

मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व मराठा सेवा संघाच्या वतीने स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त अहमदनगर भुईकोट किल्ल्यात दोन वर्ष मौलाना आझाद बंदिस्त असलेल्या खोलीमध्ये त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. महबूब सय्यद, मराठा सेवा संघाचे महानगराध्यक्ष अभिजीत वाघ, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव डॉ. कमर सरुर, सल्लागार माजी मुख्याध्यापक शरफुद्दीन शेख सर, राजूभाई शेख, डॉ. शमा फारुकी, अमोल बास्कर, आसिफ सर, मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील, सचिव निसार बागवान, वहाब सय्यद, आर्कि. फिरोज शेख, अमिन धारानी, प्रा. डॉ. जब्बार पटेल, सरफराज शेख, इंजि. मोहम्मद अकील, मुबीन शेख, अनंतराव गारदे, ॲड. सुरज खंडीझोड, आरिफ प्लंबर, इस्माईल शेख, कलीम शेख, सलीम सहार आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना मौलाना आझाद महोत्सव समितीचे अध्यक्ष सय्यद खलील यांनी सांगितले की मागील काही वर्षापासून आलेल्या नवीन सरकारने जातीयवादच्या भावनेतून मौलाना अबुल कलाम आझाद यांचे नाव जयंती पुण्यतिथीच्या जीआर मधून कमी केलेले आहे. ही देशासाठी फार शोकांतिकेची बाब असून मागील ७० वर्ष सत्तेत असणाऱ्या पक्षांनी यावर आवाज उठवण्याची गरज असल्याचे सांगितले.

प्रा. डॉ. महबूब सय्यद यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा भारताच्या स्वातंत्र्यांमध्ये असलेला सहभाग व देश स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी शिक्षणासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या अनेक घटनांचा उल्लेख करत उहापोह केला. व देशाची फाळणी नाही व्हावी. यासाठी मौलाना अबुल कलाम आझाद यांनी किती प्रयत्न केले. याचे त्यांनी अनेक उदाहरणं सांगितली.

रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की आज जातीवादाची भावना समाजात एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे की जातीच्या आधारावर दुकानांमधून खरेदी विक्री करण्याचे एकमेकाला समाज आवाहन करतात. अशा वेळेस संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आपण प्रत्येक दुकानात संविधान वाटून चिटकवले पाहिजे. जेथे संविधान चिटकवलेले असेल तिथूनच खरेदी करावं असं आपण पर्याय जातीवादी शक्तींना दिला पाहिजे असे सांगितले.

माजी मुख्याध्यापक शरफुद्दीन शेख म्हणाले की शाळा व महाविद्यालयाचे स्तरावर मुलांमध्ये स्वतंत्रता सेनानीं बद्दल व्याख्यानाद्वारे वर्षभर नियमित वेगवेगळे कार्यक्रम घेतले पाहिजे. जेणेकरून येणाऱ्या नवीन पिढीला आपल्या स्वातंत्रता सेनानींबद्दल माहिती होऊ शकेल. डॉ. कमर सुरुर, डॉ. शमा फारुकी व आसिफ सर यांनी आपल्या शेर शायरी तून भावना व्यक्त केल्या.

सूत्रसंचालन आबीद दुलेखान व सय्यद वहाब यांनी केले. तर आभार निसार बागवान यांनी मांनले. कार्यक्रमास अनेक मान्यवर व एकोप्याचे पुरस्कारते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रहमत सुलतान फाउंडेशन, मुस्कान फाउंडेशन, अलकरम हॉस्पिटलच्या पदाधिकाऱ्यांनी भरपूर परिश्रम घेतले.



माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली असता भाविकांनी ठीकठिकाणी पालखीचे स्वागत केले.

# माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्यावतीने शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त शोभायात्रा

नगर– सद्गुरू शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त माळीवाडा येथील शंकर सावली मठाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त मठामध्ये आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच प्रकट दिनानिमित्त माळीवाडा परिसर येथून शोभायात्रा काढण्यात आली होती.

घोडेस्वार, पारंपारिक वाद्य, फुलांनी सजवलेली पालखीमध्ये शंकर महाराज यांची मूर्ती अशा शोभायात्राचे ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात येत होते. शोभायात्रा मार्गावर सुंदर रांगोळी काढली होती. हि शोभायात्रा ब्राह्मण गली, येथील मठापासून सुरु होऊन बारातोटी कारंजा, बंगाल चौकी, वसंत टॉकीज, कोठीची तालीम, ढोर गल्ली, माळीवाडा चौक, श्री विशाल गणेश मंदिर, फुलसौंदर चौक, आशा टॉकीज चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजामार्गे दिली गेट येथे समारोप करण्यात आला. तसेच यावेळी प्रकट दिनानिमित्त शंकर सावली मठ येथे चार दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जागरण गोंधळ, शंकर गीता पारायण, शोभायात्रा तसेच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. प्रकट दिन कार्यक्रम यशस्वीतेसाठी सेवेकरी परिश्रम घेत होते.

कार्यक्रमाचे नियोजन मठाधिपती कमलेश महाराज जंजाळे यांनी केले होते.




आ. संग्राम जगताप आणि अहमदनगर क्रुसेडर्स आयोजित ख्रिश्चन प्रीमियर लीग इंटर चर्च टर्फ क्रिकेट टुर्नामेंट स्पर्धेतील विजयी स्पर्धक.

# ख्रिश्चन प्रीमिअर लीग इंटर चर्च टर्फ क्रिकेट टूर्नामेंटला प्रतिसाद

नगर – आ. संग्राम जगताप आणि अहमदनगर क्रुसेडर्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ख्रिश्चन प्रीमिअर लीग (CPL 1) इंटर चर्च टर्फ क्रिकेट टूर्नामेंट २०२४ अहमदनगर शहरामध्ये प्रथमच पार पडली. यामध्ये १६ टीम नी सहभाग नोंदविला तसेच १४४ खेळाडू या खेळामध्ये खेळले. या टूर्नामेंटला प्रतिसाद मिळाला.

या सर्व स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी आमदार संग्राम जगताप, गणेश गोंडाळ आणि सागर घोडके यांचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ऑर्गनायझर टीमने परिश्रम घेतले.

सागर घोडके, राहुल पाटोळे, शारोन पाटोळे, जयेश खरात, आकाश आल्हाट, प्रतीक काळे, मानस लोंढे, अभिजीत मकासरे, सिल्वन शिंदे, प्रतीक पाडळे, प्रतीक पंडित, दिव्यांक वाघमारे, सुनित ढगे या ऑर्गनायझर टीमने परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या.

# निरंकारी मिशनचा ७७ वा वार्षिक संत समागम १६ नोव्हेंबरपासून नगर शहरासह जिल्ह्यातून हजारो निरंकारी भक्त उपस्थित राहणार




नगर – सदगुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमीतजी यांच्या पावन छत्रछायेखाली निरंकारी मिशनच्या वतीने तीन दिवसीय ७७ वा वार्षिक निरंकारी संत समागमचे आयोजन आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे १६ ते १८ नोव्हेंबर पर्यंत होणार असून संत समागमाला नगर शहरसह जिल्ह्यातून तसेच अहमदनगर क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या शाखा बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, आदी ठिकाणाहून हजारो निरंकारी भक्त उपस्थित राहणार असल्याची माहिती मंडळाचे नगर क्षेत्र प्रमुख हरीश खूबचंदानी यांनी दिली.

निरंकारी संत समागम मानवतेचा असा एक दिव्य संगम असतो जेथे ज्ञान, प्रेम आणि भक्तीचा अनुपम दृश्य पहायला मिळते. धर्म, जात, भाषा, प्रांत तसेच गरीब–श्रीमंत, उच्च– नीच आदी बंधनाच्या पलीकडे जाऊन विश्वबंधुत्वाचा साकार चित्र प्रत्यक्षात अनुभवता येईल. यंदाचा समागमाचा विषय 'विस्तार, अनंताच्या दिशेने' असा असून तीन दिवस गीत, विचार, कविता आदी माध्यमातून भक्तगण भक्तीच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकतील. सतगुरु माताजी आणि निरंकारी राजपिताजी यांच्या प्रवचनरूपी अमूल्य उपहाराची तसेच भव्य दर्शनाचा भाविक लाभ प्राप्त करतील.

या आयोजनामध्ये देशभरातून लाखोंच्या संख्येने भाविक– भक्तगण सहभागी होतील. परदेशातून ही मोठ्या संख्येने निरंकारी अनुयायी उपस्थित राहतील. समागम परिसर भव्य रूपात सजविण्यात आला असून विशाल सत्संग पंडाल मध्ये सर्वांची बसण्याची उचित व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच परिसरात एलईडी स्क्रीन लावण्यात येत आहेत. शेकडो एकर वरील मैदानांवर आयोजित समागम परिसराला ए,बी, सी, डी, ग्राउंड अशा चार भागांमध्ये विभाजन केले असून ए ग्राउंड मध्ये मुख्य सत्संग समारोह, निरंकारी प्रदर्शनी, प्रकाशन, कॅन्टीन, लंगर, पार्किंग, कार्यालये असतील, इतर तीन ग्राउंड मध्ये भाविक भक्तांच्या राहण्याची व्यवस्था निवासी तंबूत करण्यात आली असून सोबत आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. समागम मध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक भाविक भक्ताला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये अशी व्यवस्था प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मार्फत केली जात असून यात निरंकारी सेवा दलाचे हजारो महिला पुरुष सदस्य योगदान देत आहेत. मुंबईच्या गोपी अँड पार्टी टीम कडून संपूर्ण परिसरात व भव्य मुख्य प्रवेशद्वार उभारला जात आहे. एकंदरीत समालखाच्या आध्यात्मिक स्थळी 'भक्ती नगरीचे' रूप धारण होत आहे.

प्रेम, सदभाव आणि एकत्वाचा दिव्य संदेश प्रदर्शित होणाऱ्या मानवतेच्या या महासमागमामध्ये समस्त बंधू भगिनी भाविक सादर आमंत्रित आहेत.





भुईकोट किल्ला परिसरात भरलेल्या विविध पक्ष्यांच्या शाळेचे निरीक्षण करताना अजिंक्य सुपेकर, हरियालीचे सुरेश खामकर व पक्षीमित्र. दुसऱ्या छायाचित्रात विविध पक्षी.

# भुईकोट किल्ला परिसरात भरतेय विविध पक्षांची शाळा

## हरियाली व अहमदनगर बर्डींग पाल्सचा पक्षी दिनानिमित्त पक्षी निरिक्षचा उपक्रम

नगर – येथील हरियाली संस्था व अहमदनगर बर्डींग पाल्सच्या वतीने राज्य पक्षी सप्ताह आणि राष्ट्रीय पक्षी दिना निमित्त ऐतिहासिक भुईकोट किल्ला परिसरात पक्षी निरीक्षणाचा उपक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी पक्षी मित्रानां ४६ प्रजांतीचे अनेक पक्षी आढळुन आले असुन त्यांची नोंद भारताच्या अधिकृत ई बर्ड चेक लिस्ट करण्यात आली आहे.

या प्रसंगी हरीयालीचे अध्यक्ष सुरेश खामकर यांनी या उपक्रमासाठी उपस्थित असलेल्या पक्षी मित्रांचे स्वागत करुन पक्षी सप्ताहाचे महत्व विषद करताना म्हणाले ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक मारुती चित्तमपल्ली व ज्येष्ठ पक्षीशास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून राज्य शासन ५ ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षी सप्ताह साजरा केला जातो. राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विशद व्हावे, लोकजागृती व्हावी हा यामागचा उद्देश असुन जगभरातील पक्ष्यांची जैवविविधता झपाट्याने कमी होत असून, अनेक पक्षी प्रजाती दुर्मीळ श्रेणीत समाविष्ट होत आहेत. राज्यातील पक्ष्याचे महत्त्व प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या संरक्षणाप्रती जबाबदारी स्पष्ट व्हावी यासाठी व्यापक जनजागृती होण्याची गरज आहे, असे श्री.खामकर म्हणाले

अहमदनगर बर्डींग पाल्सचे अजिंक्य सुपेकर यांनी सांगीतले की पक्षी निरिक्षणाचा छंद जोपासल्यामुळे दृष्टी निरोगी राहण्यास मदत होते. एकाग्रता वाढते, जीवनातला निखळ आनंद मिळविता येतो. तसेच त्यांनी पक्षी निरीक्षण कश्या पध्दतिने करण्याबाबत सुचना देवुन पोस्टर व पक्षांचे चित्रे दाखवुन पक्षी कसे ओळखावे याची माहिती दिली.

या नंतर भुईकोट किल्ल्याच्या बाहेरील बाजुने असलेल्या २ की.मी. अंतराच्या खंदकात पाण्यामधिल पाण पक्षांसह सर्वसाधारण पक्षी लांबपल्यांच्या दुर्बीणीच्या साह्याने शोधुन पक्षी निरीक्षण करुन त्यांची नोंद घेतली.तसेच अनेक पक्षांचे फोटो कॅम्या–यातही घेतले. यामध्ये नेहमी दिसणाऱ्या पक्षांसोबतच काही दुर्मिळ पक्षीही आढळले. या मध्ये प्रामुख्याने रानधोबी या पक्षासह खंड्या, हुदहुद, पिंगळा, ढोकरी, सातभाई, सांळुकी, होला, भारद्वाज, वेडा राघु, बुलबुल,टिटवी, कोतवाल, गाय बगळा, पाणकोंबडी, हळदी कुकुं, मोर, लांढोर, आदी ४६ प्रजातींचे अनेक पक्षी आढळुन आले असुन त्यांची नोंद भारताची ई बर्ड चेक लिस्टमध्ये करण्यात आली आहे.

या निरीक्षण उपक्रमात सुरेश खामकर, अजिंक्य सुपेकर, कु. चारुता वैद्य, आश्लेषा कुलकर्णी, प्रिया कोठारी, दिपाली येनगंदुल, डॉ. शोनक मिरीकर, ऋषीकेश मंगलारम, डॉ.हेमंत कुलांगे, नितीन मगजी, डॉ.धनंजय कुंभार, अभीजीत हंपे, ठाकुरदास परदेशी, श्रीरंग राहिंज, तुषार लहारे, अमोल बासकर, सागर थोरवे आदींसह ५४ पक्षी मित्र या उपक्रमात सहभागी झाले होते.

# बालदिना निमित्त १४ नोव्हेंबरला बालकांसाठी रूट कॅनाल शिबीर



नगर – बालदिनानिमित्त गोरे डेंटल हॉस्पिटल येथे बालकांचे रूट कॅनाल कॅम्प व मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत गोरे डेंटल हॉस्पिटल, डॉ. आंबेडकर रोड, माळीवाडा व गोरे डेंटल क्लिनिक, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, पाईपलाईन रोड या ठिकाणी बालकांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर तसेच रूट कॅनल कॅप शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरासाठी नाव नोंदणी करण्यासाठी ९०२८३०६०२० या नंबर वर संपर्क करावा.

गोरे डेंटल हॉस्पिटल चे संचालक डॉ. सुदर्शन गोरे म्हणाले की बालकांमध्ये फास्ट फूड व गोड पदार्थांमुळे मोठ्या प्रमाणात दात किडण्याच्या समस्या निर्माण होत आहेत, बाल दिनानिमित्त बालकांमध्ये दंतआरोग्य जनजागृती व्हावी म्हणून बालकांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे.

GORE DENTAL HOSPITAL

मोफत दंत तपासणी शिबिर माळीवाडा व पाईपलाईन रोड शाखा या दोन्ही शाखेमध्ये होणार आहे असे मुख व दंतशल्य चिकित्सक डॉ. चैताली गोरे यांनी सांगितले.

या शिबिरामध्ये रुग्णांची मोफत तपासणी केली जाईल तसेच पुढील रूट करणार ट्रीटमेंट व कॅप, दातात सिमेंट भरणे, कॅप बसवणे, दात काढणे असे उपचार सवलतीत करण्यात येतील. या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन गोरे डेंटल हॉस्पिटल माळीवाडा व पाईपलाईन रोड शाखेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# अर्णव सप्तर्षि याचा व्रतबंध सोहळा उत्साहात

नगर – अहिल्यानगर येथील अक्षर महर्षी अशोक सप्तर्षि यांचा नातू तसेच त्यांच्या अक्षर लेखनाच्या कार्याचा नंदादीप अखंड तेवत ठेवण्यासाठी अनेक वर्षांपासून कार्य करणाऱ्या त्यांच्या स्नुषा सौ. आरती सप्तर्षि यांचे चिरंजीव चि. अर्णव यांचा व्रतबंध येथील हॉटेल संजोग मनमाड रोड येथे ११ नोव्हेंबर ला शाही थाटात पार पडला.

याप्रसंगी अनेक डॉक्टर्स, वकील व प्रतिष्ठीत बंधुभगिनी उपस्थित होते. त्यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली.



पद्मश्री पोपटराव पवार यांनी मल्लखांब खेळाडूंना मार्गदर्शन केले. याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना मोहनलाल मानधना, इतर उपस्थित प्रशिक्षक.

# पद्मश्री पोपटराव पवार यांचे मल्लखांब खेळाडूंना मार्गदर्शन

नगर – अहिल्यानगरचे भूषण पद्मश्री पुरस्काराने सन्मानित पोपटराव पवार यांनी अहमदनगर शहरातील श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब ॲण्ड योगा ट्रेनिंग सेंटरला सदिच्छा भेट दिली. मल्लखांब आणि योगाचा सराव करणारा खेळाडूंना त्यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी बोलताना अहमदनगर शहरांमध्ये अशा पारंपारिक खेळाचा प्रचार प्रसार या ट्रस्टच्या माध्यमातून केला जात आहे ही कौतुकाची बाब आहे असे प्रतिपादन करून ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना हे राष्ट्र सशक्तीकरणात मोलाचा वाटा उचलत आहे अशी भावना व्यक्त केली तसेच मल्लखांब प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक उमेश झोटिंग सर, प्रणिता तरोटे, आप्पा लाढाने, अक्षता गुंड पाटील, अक्षय पावडे यांचे अभिनंदन केले.

# अय्यप्पा मंदिरात ६० दिवसांचा मकर विल्लकु महोत्सवास १६ नोव्हेंबरपासून प्रारंभ



सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिरामध्ये ६० दिवसांच्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सव प्रारंभ होत आहे. फोटोत मंदिर व मूर्ती दिसत आहेत

नगर – सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे. या मंदिरामध्ये १६ नोव्हेंबर पासून ६० दिवसांच्या मंडल महापूजा आणि मकर विल्लकु महोत्सव १६ नोव्हेंबर २०२४ ते १४ जानेवारी २०२५ पर्यंत होणार आहे. त्यानिमित्ताने रोज धार्मिक कार्यक्रम होत आहे, अशी अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली आहे.

श्री अय्यप्पा मंदिरात रोज संध्याकाळी दर्शनाला भाविक गर्दी करतात, उत्सावा निम्मित ६० दिवस दररोज पूजा पुढीलप्रमाणे होणार आहे. पहाटे ५.३० वा पल्लीयुनथरल नंतर निर्मल दर्शन, सकाळी ६ वा. अभिषेक, गणपती होम, स. ७ व प्रसन्न पूजा तर नंतर स. १० वाजेपर्यंत अर्चना, निरांजन व विविध पूजा तसेच संध्या. ५. ३० वा. अलंकार दर्शन, नंतर दीप आराधना, महाआरती, पुष्पाभिषेक, रात्री ८ वा. अथर्व पूजा व नंतर दर्शन, अर्चना, निरांजन आणि भजन व हरीवरासम नंतर महाप्रसाद होणार आहे.

तसेच विशिष्ट दिवशी धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे तर २६ डिसेंबरला मंडलपूजा होणार आहे उत्सवाची सांगता १४ जानेवारी २०२५ ला मकर वीलक्कु उत्सवाने होणार आहे दक्षिण भारतीयासह महाराष्ट्रातील भाविकाची श्रद्धा असलेले अय्यप्पाचे मंदिर केरळ मधील शबरीमळा येथे असून त्या मुख्य उत्सवाचा धर्तीवर नगरमध्ये हा केला जातो.

अय्यप्पा सेवा समितीने आयोजित केलेल्या दोन महिन्याचा उत्सवात भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अय्यप्पा सेवा समितीच्या पदाधिकारी यांनी केले आहे.

# समाजात एकोप्याने मिळून-मिसळून राहिल्यास गोडवा निर्माण होणार

## जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; स्नेहालयात वंचित मुलांसह दीपोत्सव उत्साहात साजरा





शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबच्यावतीने एम.आय.डी.सी.तील स्नेहालयात वंचित घटकातील मुलांसह दिपोत्सव साजरा करताना जिल्हा व सत्र न्यायाधिश अंजू शेंडे आदी. दुसऱ्या छायाचित्रात दिपोत्सवाचे उद्‌घाटन करताना जिल्हा व सत्र न्यायाधिश अंजू शेंडे. समवेत डॉ. गिरीश कुलकर्णी आदी.

नगर – बुंदीच्या लाडूप्रमाणे समाजात एकोप्याने मिळून–मिसळून राहिल्यास गोडवा निर्माण होणार आहे. कोणासाठी काहीतरी करणे, ही भावना सामाजिक जाणीव म्हणून प्रत्येकात असली पाहिजे. मनुष्याला जास्तीचे पाहिजे असल्याने ओरबडण्याची प्रवृत्ती निर्माण होते व त्यातून प्रश्न निर्माण होत असल्याचे प्रतिपादन प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

शहरातील लायन्स क्लब ऑफ अहमदनगर व लिओ क्लबच्या वतीने सलग सतराव्या वर्षी एमआयडीसी येथील स्नेहालयात वंचित घटकातील मुलांसह दीपोत्सव साजरा करण्यात आला. वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवून त्यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी जिल्हा सत्र न्यायाधीश शेंडे बोलत होत्या. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्या. भाग्यश्री पाटील, डॉ. एस.एस. दीपक, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, शरद मुनोत, मोहन मानधना, बाबूशेठ बोरा, ॲड. अनुराधा येवले, लायन्सच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरनकौर वधवा, खजिनदार अंजली कुलकर्णी, लियो क्लबच्या अध्यक्षा रिधिमा गुंदेचा, सचिव रचिता कुमार, खजिनदार हर्षवर्धन बोरुडे, स्नेहालयाचे गिरीश कुलकर्णी, ॲड. श्याम असावा, हनीफ शेख, अरविंद पारगंवाकर

प्रशांत मुनोत, आनंद बोरा, सुनील छाजेड, दिलीप कुलकर्णी, डॉ. संजय असणानी, संतोष माणकेश्वर, सतीश बजाज, मानसी असणानी, अजित शिंगवी, अर्पिता शिंगवी, कैलाश नवलानी, नितिन मुनोत, अर्चना माणकेश्वर, पुरुषोत्तम झंवर, प्रकल्प प्रमुख आंचल कंत्रोड, गुरनूरसिंग वधवा, हर्ष किथानी, उमेश तलरेजा, आरवी कांगे, अंश कार्ला, प्रीत कंत्रोड, यश कांगे, शंभव कासवा, चंदना गुंदेचा आदी उपस्थित होते.

पुढे न्यायाधीश शेंडे म्हणाल्या की, शाळा मूल्यशिक्षण देणारे पहिले माध्यम आहे. चांगल्या शाळेतून चांगले नागरिक घडत असतात. सामाजिक बांधिलकी घेऊन सुजाण नागरिक देत असलेल्या योगदानाची फलश्रुती चांगला समाज घडविण्यासाठी होत आहे. ध्येय प्राप्तीसाठी सातत्य ठेवून भविष्य घडविण्याचे आवाहन त्यांनी केले. तर स्नेहालयाच्या सामाजिक कार्याचे व लायन्सच्या उपक्रमाचे कौतुक केले.

रांगोळ्यांनी सजलेले अंगण, लखलखत्या पणत्यांचा झगमगाट, फटाक्यांची आतषबाजी व आकाश दिव्यांनी उजळलेले आसमंत तर संगीताच्या तालावर ठेका धरत वंचित घटकातील मुला–मुलींनी दिवाळीचा आनंद लुटला. मोठ्या उत्साहात साजरा झालेल्या दीपोत्सवात स्नेहालयासह बालभवन मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रास्ताविकात लायन्स क्लबच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर यांनी वंचित घटकातील मुलांसमवेत दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी दरवर्षी दीपोत्सवचे आयोजन केले जाते. या दीपोत्सवाचे सतरावे वर्ष असून, लायन्स क्लब मधील प्रत्येक सदस्य सेवाभावाने स्वतः ला झोकून समाज घडविण्याचे कार्य करत आहे. या सेवा कार्यात लिओच्या युवक–युवतींनी देखील सामाजिक भावनेने योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले. लिओ क्लबच्या अध्यक्ष रिधिमा गुंदेचा यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, सलग १६ वर्षे वंचितांसाठी दीपोत्सव साजरा करणे कौतुकास्पद आहे. सामाजिक कार्याच्या दिव्यांनी समाजातील अंधकार दूर करण्याचे काम लायन्स करत आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या परीने योगदान दिल्यास समाजातील अनेक प्रश्न सुटणार आहे. वंचितांना आनंद देणे, ही आपली भारतीय संस्कृती असल्याचे त्यांनी सांगितले.

न्या. भाग्यश्री पाटील यांनी कायदेविषयक कार्यक्रम, मोफत विधी सेवेची माहिती दिली. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून देहविक्री करणाऱ्या महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि वंचित घटकातील बालकांना प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने असलेल्या योजनांची माहिती दिली. मुलांना चांगला स्पर्श, वाईट स्पर्श व सुरक्षित काळजी घेण्याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. एस.एस. दीपक म्हणाले की, वंचितांच्या जीवनात आनंद निर्माण करणे, हा खरा दिवाळीचा आनंदोत्सव आहे. दरवर्षी या दीपोत्सवाने जीवनात वेगळा आनंद मिळतो. अशा सामाजिक उपक्रमांना नेहमीच पाठबळ दिले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रारंभी स्नेहालयातील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम रंगला होता. कार्यक्रम रंगात आल्यावर डिजेच्या तालावर बालगोपालासह उपस्थित पाहुण्यांनी गीतांवर ठेका धरला होता. या मेळाव्यात मुलींनी हातावर मेहंदी, मुलांनी टॅटू काढून विविध खेळांचा आनंद लुटला. यावेळी घेण्यात आलेल्या किल्ला बनवा व विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रिया बोरा, भावना छाजेड, डॉ. मानसी असणानी, रिधिमा गुंदेचा यांनी काम पाहिले.

संध्याकाळी स्नेहालय परिसरात लावण्यात आलेल्या पणत्यांच्या प्रकाशाने लखलखाट झाला होता. तर फटाक्यांच्या आतषबाजीने व आकाश दिव्यांनी आसमंत उजळून निघाले. या धमालमय कार्यक्रमासह विद्यार्थ्यांना वडा पाव, खाऊ, चॉकलेट, आईस्क्रिमसह भोजनाची मेजवानी होती. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी राजबीरसिंह संधू, कुकरेजा ब्रदर्स व बाजार पेठेतील व्यापाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश गायकवाड यांनी केले. आभार हरजितसिंह वधवा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घर घर लंगर सेवा, स्नेहालय परिवार, बालभवन व बाल कल्याण समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# खाकिदास बाबा मठात भक्तिभावाने भगवान गोवर्धन अन्नकोट महोत्सव



खाकिदास बाबा मठात आयोजित भगवान गोवर्धन अन्नकोट महोत्सवानिमित्त भगवान जगदीश मंदिरात मिष्टान्न व स्वादिष्ट अन्नपदार्थांचे नैव्यद्य मांडण्यात आले होते. यावेळी यजमानांच्या हस्ते भगवंताची महाआरती करण्यात आली.

नगर – दीपावली नंतर दरवर्षी लालटाकी येथील श्री खाकिदासबाबा माहेश्वरी मठ ट्रस्टच्या वतीने भगवान श्री जगदीश मंदिरात भगवान गोवर्धन अन्नकोट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मंदिरातील भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र, सुभद्रा तसेच लक्ष्मीनारायण व राम लक्ष्मण सीता या देवी देवतांच्या मुर्त्यां पुढे विविध मिष्टान्न व स्वादिष्ट अन्नपदार्थांचे नैव्यद्य मांडून अन्नकोट करण्यात आले होते. यानिमित्ताने मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी भाविकांनी भगवान जगदीशांचा जयघोष करत दर्शनासाठी गर्दी केली होती.

यावेळी आरती यजमान उषा बजाज, लता बंग, प्रमिला डागा, शोभा खटोड व शोभा काबरा आदींच्या हस्ते भगवान जगदीशांची महाआरती करण्यात आली.

यावेळी खाकिदास बाबा ट्रस्टचे अध्यक्ष दीपक काबरा, उपाध्यक्ष शिवदास डागा, कार्यकारी विश्वस्त मनोज मुंदडा, ट्रस्टी चंद्रकांत काबरा, श्रीकुमार सोनी, जगदीश दरक आदींसह माहेश्वरी समाजातीलल भाविक उपस्थित होते. या कार्यक्रमात माहेश्वरी समाजातील विविध मान्यवरांचा सन्मान ट्रस्टच्या वतीने करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विश्वस्त ॲड.सुनील मुंदडा यांनी केले. किसन बंग, अमोल सोनी, भूषण काबरा व श्रुती बजाज आदींनी मंदिर परिसर सजावट केली. अन्नकुटच्या महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी १५ नोव्हेंबरला मोफत श्रवणदोष तपासणी शिबीर

नगर – रोटरी ई क्लब ऑफ़ एम्पॉवरिंग युथतर्फे गायत्री मंदिर चतुर्वेद भवन, महाजन गल्ली येथे १५ नोव्हेंबर रोजी स. ९ ते संध्या. ६ पर्यंत, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत श्रवणदोष तपासणी शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरासाठी नगर मधील श्रवणयंत्रा साठी स्वामी हिअरींग ॲण्ड सेंटरचे संचालक तेजस स्वामी आणि त्यांचे सहकारी मदत करणार आहेत.

या शिबिरा मध्ये मोफत श्रवणदोष तपासणी, प्रोग्रामिंग व मार्गदर्शन केले जाणार आहे. त्याच प्रमाणे सर्व शिबिरार्थीचे श्रवण यंत्र संदर्भातील शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. ज्यांना ऐकण्याची समस्या आहे, समोरच्याला मोठ्यानी अथवा वारंवार बोलायला लावणे, टी व्ही मोठ्या आवाजात ऐकणे, हाक ऐकु न येणे, फोनची अथवा दरवाज्याची बेल ऐकु न येणे, गोंधळात स्पष्ट ऐकु न येणे ज्यांना अशा प्रकारची लक्षणे असतील अथवा श्रवणयंत्र वापरण्याबाबत कोणती शंका असेल, त्यांनी नक्की या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन रोटरी ई क्लबतर्फे क्लबचे अध्यक्ष स्विटी पंजाबी, सचिव डॉक्टर बिंदू शिरसाठ आणि ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विजया निसळ यांनी केले आहे.

ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा. माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क मो. ९९६०२१२८४८.

## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी म.सा. आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

**"कैसे बनाए मित्र जिससे अच्छा बने चरित्र"**

आपले चरित्र तर चांगलेच असते. आपले संस्कार उत्तम असते पर आणखीन चांगले बनायचे असेल तर आपण काही न करता फक्त चांगल्या लोकांबरोबर मैत्री करा. चरित्र ओळख आपोआप बनेल. जसे- पाण्याचा एक थेंब मातीमध्ये पडला तर ती माती ओली होते. पाण्यात माती मिसळते. गरम लोखंडावर पाणी टाकले तर त्याची वाफ तयार होते. सापाच्या तोंडात सापडले तर विष बनते आणि तेच जर शिंपलाच्या तोंडात जर पडला तर तो मोती बनतो. ठिक तसेच व्यक्तीला जशी संगत मिळते, तसाच तो बनतो. शेकडो मित्र असणे जरुरी नाही तर चांगला मित्र एकच असला तरी तो शेकडो मित्राप्रमाणेच आहे. आपली मैत्री तलावाच्या पक्षीसारखी नसवी कि तहान लागली तर पाणी पिले आणि उडून गेले. मैत्री ही मेणबत्तीसारखी असावी कि जेव्हा धागा जळते जळेल त्यावेळेस मेण वितळण्यास सुरुवात होते. आपण दूध पाण्याची मैत्री पाहिली असेलच. पाणी ने दूध बरोबर मैत्री केली तर दुधाने स्वतःचा पांढरा रंग पाणीला दिला. तसेच जेव्हा दूध गरम होते, तेव्हा मित्राच्या दुःखात पाणी वाफ बनते व उडते. पाण्याला वाफात रुपांतर होतं पाहताच दूध आगीत पडते. जर गृहिणीने उतु जाणाऱ्या दुधात पाणी टाकले तर दूध उफणे बंद होते. मित्र मिळताच शांत होते. जर दूध पाण्याची इतकी मैत्री असते तर मानवाची किती व कशी मैत्री असावी. मैत्री असे नाते आहे. ज्यामध्ये प्रत्येक भावना विनास्वार्थ असते. मित्र सदा एकमेकाच्या सुख-दुःखात मदतीला येतात. म्हणूनच जीवनात मित्र असणे फार गरजेचे आहे. या जगात तीन प्रकारचे मित्र आहे. (१) एक प्याली (२) ताली मित्र (३) थाली मित्र.

(१) एक प्याली म्हणजे सतत सुखात असणे सुखात असणे बरोबर राहणे पिणे.

(२) ताली मित्र : असा मित्र जो सण, लग्न आदि समारंभात याच ठिकाणी भेटतो यापेक्षा पुढे जात नाही.

(३) थाली मित्र : असा मित्र जो एकाच ताटात मित्राबरोबर जेवण करतो.

ज्याच्यामध्ये मित्रत्वसाठी आपलेपणा आहे, तसेच मित्राच्या जीवनात कोणत्याही क्षणी ठाण उभा राहून साथ देतो.

जीवनात आपल्याला सर्व काही मिळाले तरी मित्राशिवाय सर्व अपूर्ण आहे. जसे आई वडील गुरु शिवाय अपूर्ण तसेच आयुष्यात एक तरी मित्र असावा. - **सौ. सविता चोरडिया**

## सोन्याच्या दरात १५००, तर चांदीच्या दरात २५०० रुपयांपेक्षा अधिक घसरण

मुंबई - सराफा बाजारात मंगळवारी (दि.१२) सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण झाली. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार २४ कॅरेट सोन्याचा भाव १५१९ रुपयांनी कमी होऊन ७५३२१ रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे. चांदीच्या दरात २५५४ रुपयांची घसरण झाली आहे. हा दर आयबीएनं जारी केला आहे, ज्यावर जीएसटी आकारण्यात आलेला नाही. तर दुसरीकडे चांदीचा भाव ८८३०५ रुपये प्रति किलो ग्रॅम वर खुला झाला. आज २३ कॅरेट सोन्याचा भाव १५१३ रुपयांनी कमी होऊन ७५०१९ रुपये प्रति १० ग्रॅम झाला. तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १३९१ रुपयांनी कमी होऊन ६८९९४ रुपये झाला आहे. तर १८ कॅरेट सोन्याचा भाव आज ११३९ रुपयांनी कमी झाला असून तो ५६४९१ रुपये प्रति १० ग्रॅम वर खुला झाला. १४ कॅरेट सोन्याचा भाव ८८८ रुपयांनी घसरून ४४०६३ रुपये प्रति १० ग्रॅम झाला आहे.

# उड्डाणपुलाखालील झाडे, छोट्या उद्यानांच्या देखभालीकडे दुर्लक्ष

### आयुक्त यशवंत डांगे यांनी पाणी केले उपलब्ध, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांना दिले पत्र






उड्डाणपुलाखाली झाडे, छोट्या उद्यानांच्या देखभालीसाठी पाणीपुरवठा करताना आयुक्त यशवंत डांगे तसेच दुसऱ्या छायाचित्रात स्टेट बँक चौक व सक्कर चौक येथील छोट्या उद्यानांना पाणीपुरवठा करताना.

नगर - शहरातील उड्डाणपुलामुळे व त्याखाली दुभाजकात लावण्यात आलेली झाडे, स्टेट बँक चौक व सक्कर चौक येथील छोटे उद्यान, पिलरवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या रेखाचित्रांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली. मात्र, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग व उड्डाणपूल ठेकेदार यांच्या वादात दुभाजकातील झाडे, उद्यानाच्या देखभालीकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, झाडे जळण्यास सुरुवात झाली आहे. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे हे सोमवारी शहरात पाहणी करत असताना ही बाब त्यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी तत्काळ झाडांसाठी पाणी उपलब्ध करून दिले. दरम्यान, या प्रकरणी दखल घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता यांनी मध्यस्थी करावी व बांधकाम विभागाकडून याची देखभाल करावी, असे पत्र आयुक्त डांगे यांनी त्यांना दिले आहे.

सक्कर चौक ते स्टेट बँक चौकापर्यंत दुभाजकांमध्ये लावण्यात आलेल्या झाडांची, पुलाखाली करण्यात आलेल्या छोट्या उद्यानांची दुरवस्था झाली आहे. या ठिकाणी पाणी देण्यासाठी बोअर घेण्यात आले होते. मात्र, तेही नादुरुस्त असल्याचे समोर आले. आयुक्त यशवंत डांगे यांनी याची दखल घेत या सर्व बोअरिंगची दुरुस्ती केली. तसेच, दुभाजकांमधील झाडांना पाणी घालण्यासाठी तत्काळ टँकर उपलब्ध करून दिले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत या पुलाची उभारणी करण्यात आली. त्यानंतर हा उड्डाणपूल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. ठेकेदार संस्थेकडून व बांधकाम विभागाकडून या झाडांची, छोट्या उद्यानांची देखभाल होत नसल्याने झाडे जाळण्यासाठी सुरुवात झाली आहे. साफसफाई होत नसल्याने कचरा साचला आहे. आयुक्त यशवंत डांगे यांनी पाणी उपलब्ध करून दिले असले तरी यापुढे झाडांची व छोट्या उद्यानांची देखभाल करण्यासाठी ठोस उपाययोजना होण्याची गरज आहे.

# 'ते' नगर शहरात राजे म्हणून वावरतात पण मी योद्धा आहे, लढतच राहणार : अभिषेक कळमकर







नगर शहरातील विकासासाठी अभिषेक कळमकर मतदारासांमोर निर्धार व्यक्त करताना. दुसऱ्या छायाचित्रात बोल्हेगाव-नागापूर भागात नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळताना. तिसऱ्या छायाचित्रात नगरच्या विकासासाठी नागरिकांसमोर योजना मांडताना अभिषेक कळमकर.

नगर - ते शहरात राजे म्हणून वावरत आहेत. त्यांना राजे म्हणूनच राहू द्या, पण मी योद्धा आहे. योद्धाप्रमाणे दहशतीविरोधात, गुंडगिरीविरोधात लढत राहणार. माझ्या विजयाचा मार्ग मृत्यूतून असला तरीही मी लढतच राहणार, मागे हटणार नाही, अशी ग्वाही महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी दिली.

नगर शहर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार अभिषेक कळमकर यांनी आपल्या प्रचार दौऱ्यात बोल्हेगाव आणि नागापूर या भागाला भेट देऊन केली. नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या प्रचार फेरीमध्ये नागरिकांनी कळमकर यांना खंबीर पाठिंबा देण्याचे आश्वासन देत, त्यांच्याबरोबर उभे राहण्याची भूमिका मांडली.

अभिषेक कळमकर यांनी आपल्या भाषणात नगर शहरातील सर्वांगीण विकासासाठी कृतिशील योजना मांडल्या. त्यांनी या परिसरात मोठी MIDC डेव्हलप करून तेथे एक कामगार वसाहत स्थापन करण्याचा संकल्प व्यक्त केला. या MIDC च्या माध्यमातून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा कळमकर यांचा मनोदय आहे. याशिवाय कामगारांसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असे कामगार रुग्णालय उभारून त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. यामुळे कामगारांना वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी अन्यत्र जाण्याची गरज भासणार नाही, असे त्यांनी नमूद केले.

### बोल्हेगाव-नागापूर भागात नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

यावेळी बोलताना अभिषेक कळमकर यांनी नागरिकांना तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हासमोरचे बटन दाबून मतरूपी आशीर्वाद देण्याचे आवाहन केले. नगर शहराच्या विकासासाठी, महिलांच्या सुरक्षिततेसाठी, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी, तसेच सामाजिक एकोपा साधण्यासाठी कळमकर यांनी आपले काम काज स्पष्ट केले. नगर शहराचे सर्वांगीण विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी जनतेच्या मतांची गरज आहे, असे ते म्हणाले. या प्रचार दौऱ्यात महाविकास आघाडीचे प्रमुख नेते दत्ता जाधव, संभाजी कदम, विक्रम राठोड, बाळासाहेब बोराटे तसेच अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रचाराला विशेष उर्जा मिळाली असून, कळमकर यांचा संकल्प दृढ झाला आहे.

### शहराच्या विकासासाठी संकल्प

नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागरुकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट अभिषेक कळमकर यांचे आहे. या दौऱ्यात त्यांनी शहराच्या एकूणच विकासाची आपली योजना स्पष्ट केली. MIDC, कामगार वसाहत, कामगार रुग्णालय, महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष पावले, आणि शहरात रोजगार निर्मितीचे केंद्र निर्माण करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.नगर शहरातील नागरिकांनी या संकल्पाला प्रतिसाद दिला आहे. शहराच्या उज्वल भविष्यासाठी कळमकर यांच्या नेतृत्वात एक नवा अध्याय सुरू होणार असल्याची आशा यावेळी उपस्थितांमध्ये व्यक्त झाली.

# आ.संग्राम जगताप यांना नगर शहरातून माझ्यापेक्षा अधिक लीड देवून विजयी करा : डॉ. सुजय विखे पा.

### महायुतीची घटक पक्षाची बैठक

नगर - विधानसभा निवडणुकीत महायुतीतील सर्व घटक पक्षांनी पुन्हा एकदा संग्राम जगताप यांना आमदार करण्याचा संकल्प केला आहे. आ.जगताप यांच्यासाठी चांगले वातावरण असल्याने नगर शहरातील निवडणूक संपल्यातच जमा आहे. राज्यात पुन्हा महायुतीचीच सत्ता येणार आहे असे पोषक वातावरण निर्माण झाले आहे. लोकसभा निवडणुकीत माझा पराभव जरी झाला असला तरी नगर शहरातून मोठा लीड मला मिळाला. त्यासाठी संग्राम जगताप यांनी प्रामाणिकपणे पूर्ण ताकदीने काम केले. आता अशीच ताकद सर्वांनी मिळून महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या पाठीशी उभी करून त्यांना माझ्यापेक्षा अधिक लीड देवून विजयी करा हे सांगण्यासाठी मी येथे आलो आहे, असे आवाहन माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी केले.

महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी डॉ. सुजय विखे यांनी सोमवारी सायंकाळी नगर शहरात महायुतीतील घातक पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी डॉ.विखे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजप सरचिटणीस सचिन पारखी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुरेंद्र गांधी, शहर प्रमुख सचिन जाधव, माजी नगरसेवक धनंजय जाधव, आरपीआयचे नेते अजय साळवे, सुरेश बनसोडे, अरविंद शिंदे, रेश्मा आठरे, अंजली आढाव, गीता गिल्डा, प्रिया जानवे, सुरेखा विद्ये, नितीन शेलार, पोपट पाथरे आदींसह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, माजी नगरसेवक उपस्थित होते.



महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ.सुजय विखे

यावेळी डॉ.विखे पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीची २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार असून २४ तारखेला माझा वाढदिवस आहे. या वाढदिवसाची भेट मला आ.संग्राम जगताप यांना ५० हजाराहून अधिक मताधिक्याची सर्वांनी द्यावी. निवडणुकीतील विरोधकांचे काहीच अस्तित्व नाहीये. त्यांची संघटना एका खोलीत मावणारी आहे. पण आमची महायुती हे विशाल आहे. महायुतीचे नेते देवेंद्र फडविसांच्या आदेशाला आम्ही बांधील असून महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराला निवडून आणण्यासाठीही आम्ही कटीबद्ध आहोत. या निवडणुकीत भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाचे अस्तित्व दाखवून जास्तीत जास्त लीड आ.जगतापांना द्यावा. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आल्यावर नगरची नवी एमआयडीसी, नवे डीपी रस्ते, पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या स्मारकाचे काम असे अनेक प्रलंबित कामे मी व आ.संग्राम जगताप मिळून करणार आहोत.

बैठकीच्या प्रस्ताविकात संपत बारस्कर म्हणाले, विधानसभा निवडणुकीसाठी गेल्या महिनाभरा पासून महायुतीमधील पक्षाचे पदाधिकारी पळत आहेत. यामध्ये भाजपाचे काम मोठे आहे. महायुतीमधील सर्व एकसंघाने, एकदिलाने आ.संग्राम जगताप यांचे काम करत आहेत.

या निवडणुकी नंतर राज्यात पुन्हा महायुतीचेच राज्य येणार असून संग्राम जगताप हे तिसऱ्यांदा निवडून येत मंत्रीही होतील.

# शेअर मार्केट फसवणूक प्रकरणातील तिघांना अटक

### फसवणुकीचा आकडा ११ लाखांवरून १ कोटी ४३ लाखांवर

नगर - शेअर मार्केट व फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सुमारे १.४३ कोटींची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी जून महिन्यात ११.२० लाखांच्या फसवणुकीचा गुन्हा कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल झाला होता. मात्र, तपासात फसवणुकीचा आकडा सुमारे दीड कोटींवर पोहचला आहे. दरम्यान, या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

याबाबत संदीप बाबुराव कोठुळे (वय ४३, रा. साखर कारखाना कामगार वसाहत, श्री शिवाजीनगर, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार श्रीमंता बाझार (ओपीसी) प्रा.लि. कंपनीचे संचालक एच. आर. श्रीकांत आचार्य (रा. पाटील हाऊस, शुक्रवार पेठ, पुणे), धमेन्द्रसिंग सेगर (रा. बुधती होरांगाबाद, भोपाळ, मध्यप्रदेश), दिनेश योगेश भटनाकर (रा.प्लॅट नं. ४०२, अशोका हेरिटेज, विशालनगर, पिंपळे निलख, पुणे), साजीद शेख (रा. कोंढवा बुद्रुक, पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आचार्य, भटनाकर व शेख यांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींनी शेअर मार्केट व फॉरेक्स मार्केटचे सेमीनार आयोजित केले होते. यात फिर्यादी व यांना माहीती मिळाली. फिर्यादीचा विश्वाससंपादन करुन त्यांच्याकडून ११ लाख २० हजार रुपये गुंतवणुकीसाठी घेतले. त्यानंतर आरोपींनी श्रीमंता बाझार (ओपीसी) प्रा.लि. या कंपनीचे कार्यालयच बंद केले. फिर्यादीसह इतर काही गुंतवणुकदारांच्या पैशांचा अपहार केल्याप्रकरणी जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास उपनिरीक्षक प्रवीण पाटील करत आहेत. तपासात त्यांनी इतर साक्षीदारांची माहिती घेतल्यावर फसवणुकीची रक्कम १.४३ कोटींवर पोहचली आहे. दरम्यान, या आरोपींवर इतरही फसवणुकीचे गुन्हे असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# झेंडीगेट परिसरातील कत्तलखान्यावर पोलिसांचा छापा

### २०० किलो गोमांस केले जप्त, दोघांविरूध्द गुन्हा दाखल

नगर - झेंडीगेट परिसरातील व्यापारी मोहल्ला येथे सुरू असलेल्या कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रविवारी (दि.१०) छापा टाकून २०० किलो गोमांस, लोखंडी सुरा, चाकू असा ६० हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार बाळासाहेब गुंजाळ यांनी फिर्याद दिली आहे.

जावेद उस्मान कुरेशी (वय ५०, रा. डावरे गल्ली, व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) व इरफान हनिफ कुरेशी (वय ३८, रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. व्यापारी मोहल्ला येथील २२ नंबर मस्जिद समोरील पत्र्याच्या शेडमध्ये काही इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांस विक्री करत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने रविवारी सकाळी नऊच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकून कारवाई केली.

# विकास कामातून समृद्ध नगरची निर्मिती करू

### डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन; महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ प्र.क्र.२ मध्ये विकास यात्रा




डॉ. सुजय विखे पाटील महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.२ मध्ये आयोजित विकास यात्रेत सहभागी झालेले डॉ. विखे, आ. जगताप व यात्रेत सहभागी झालेले नागरिक. (छाया - लहू दळवी)

नगर - आ. संग्राम जगताप व मी शहर विकासाची संकल्पना हाती घेऊन मुहूर्तमेढ रवली आणि विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवल्या या पुढील काळात चांगले काम उभे करू आणि समृद्ध नगरची निर्मिती करू. विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती पूर्णपणे सज्ज आहे आणि ते महायुतीचे उमेदवार असले तरी ते माझे मित्र आहेत. अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातून आमदार संग्राम जगताप ५० हजार मतांनी विजयी होतील. त्यांनी माझ्या लोकसभा निवडणुकीमध्ये चांगले काम केले असल्यामुळे मला कठीण परिस्थितीत देखील ३५ हजार मतांचे मताधिक्य दिले होते. आता तर चांगले वातावरण आहे शहरात ठिकठिकाणी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले जाते त्यांनी केलेल्या विकास कामावर नगरकरांनी विश्वास ठेवला असल्याचे प्रतिपादन माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी केले.

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ प्रभाग क्रमांक २ मध्ये विकास यात्रा झाली. यावेळी सुजय विखे पाटील, निखिल वारे, विनीत पाऊलबुद्धे, बाळासाहेब पवार, रूपालीताई वारे, संजय बुधवंत, सचिन लोटके, श्रीकृष्ण पवार, विशाल नाकाडे, धीरज उकिरडे, राहुल सांगळे, वैभव पोकळे, बाबासाहेब घुले, महेश तवले, संपत नलवडे, अनिल ढवण, नितीन शेलार, कैलास गर्जे, योगेश पिंपळे, निखिल त्रिंबके, सुमित जायभाय, सचिन गाडे, राजू बुधवंत आदीसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

